**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ३०/१०/२०१८ रोजी संपन्न झालेल्या ४८ व्या बैठकीचे इतिवृत्त.**

मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ४८ वी बैठक मंगळवार दिनांक ३०/१०/२०१८ रोजी दुपारी २.३० वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व मंडळ सचिव उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर | मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण |
| २. | श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ |
| ३. | मा. श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. श्री. शशांक साठे, उप सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. सतिश मगर, | मालक प्रतिनिधी |
| ३. | मा. श्रीमती वेदा आगटे | मालक प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. श्रीपाद कुटासकर | कामगार प्रतिनिधी |
| ५. | मा. श्री. विजय देवरुखकर | कामगार प्रतिनिधी |
| ६. | मा. श्री. अशोक भुताड | कामगार प्रतिनिधी |
| ७. | मा. श्री. धनंजय माळी | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष (निमंत्रित) |
| ८. | मा. श्री. श्री. चु. श्रीरंगम् | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई. |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदय, मा. अध्यक्ष, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक १८/०७/२०१८

रोजीच्या मंडळाच्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत मंजूर ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीच्या अहवालासह सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली.

तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

## बैठकीचे इतिवृतांत

**विषय क्र. १: मागील बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाच्या दिनांक १८/०७/२०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तांत मंडळ सचिव यांनी वाचुन दाखविले. सदर इतिवृत्तांतातील अन्य विषयांच्या ठरावात काही बदल करावयाचे असल्यास तसे सुचवावे त्यासह इतिवृत्तांत कायम करणे प्रस्तावित आहे, अशी विनंती मंडळ सचिव यांनी केली.

मंडळाच्या दिनांक १८/०७/२०१८ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. त्यानुसार सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव ४८(१)/२०१८: मंडळाच्या दिनांक १८/०७/२०१८ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.०२ :- अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत विशेष नोंदणी अभियानाचा टप्पा- ०३ राबविणेबाबत.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत टप्पा-०१ मध्ये राज्यातील मुंबई (MMR), पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या ०६ ठिकाणी राबविण्यात आलेल्या विशेष नोंदणी अभियानामध्ये दि.२३.०२.२०१८ ते १०.०४.२०१८ पर्यंत २,२४,५७७ बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात आली आहे.

मंडळाच्या दि.२२.०५.२०१८ रोजीच्या बैठकीत मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी अटल विश्यकर्मा योजनेअंतर्गत विशेष नोंदणी अभियान इतर जिल्हयात राबविण्यापूर्वी क्रिडाई सदस्यांची बैठक आयोजित करावी तसेच सर्व बिल्डर्सना मंडळाच्या योजना, कामगारांच्या नोंदणीचे फायदे याची माहिती देण्यात यावी. असे सूचित केले व सदरचे विशेष नोंदणी अभियान दुसऱ्या टप्पयामध्ये प्रत्येक विभागातील १२ जिल्हयात राबविण्याबाबत सूचित करण्यात आले. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला होता.

ठराव: **अटल विश्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत दिनांक २३.०२.२०१८ ते १०.०४.२०१८ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विशेष नोंदणी अभियानाबाबतचा अहवाल मंडळास सादर करण्यात आला. सदर अहवालाची मंडळ सदस्यांनी नोंद घेतली, तसेच दुसऱ्या टप्प्यामध्ये प्रत्येक विभागातील दोन जिल्हयांची (एकूण १२ जिल्हे) निवड करून त्या जिल्हयात नोंदणी अभियान राबविण्याबाबत कार्यप्रणाली तयार करून नोंदणी अभियान राबविण्यात यावे. सदर अभियान राबविण्यासाठी क्रीडाई, अनुलोम संस्था, बांधकाम कामगार संघटना व या क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांची मदत घेवून शहरी व ग्रामीण भागातील जास्तीत जास्त बांधकाम कामगारांची नोंदणी मंडळाकडे करण्यात यावी.सदर अभियानात बांधकाम कामगारांच्या नोंदणीशिवाय बांधकाम कामगारांच्या नोदंणीचे नुतणीकरण, प्रलंबित लाभाचे अर्ज निकाली काढणे व नवीन लाभाचे अर्ज स्वीकारणेबाबतही कार्यवाही करण्यात यावी. सदर अभियानाकरीता आवश्यक साहित्य, मोबाईल व्हॅन व अतिरिक्त मनुष्यबळाच्या पुरवठयाकरीता मंडळ व शासनाच्या मान्यतेने यापूर्वीच्या अभियानाकरीता नियुक्त करण्यात आलेल्या मे. अँगल ॲडव्हटायझिंग, पुणे या संस्थेची नियुक्ती पुर्वी मंजूर करण्यात आलेल्या दर, अटी व शर्तीनुसार करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.** उक्त ठरावाच्या अनुषंगाने

दि.०४ जुलै २०१८ ते १४ ऑगस्ट २०१८ या कालावधीत राज्यात १२ ठिकाणी विभागीय स्तरावर बांधकाम कामगारांचे विशेष नोंदणी अभियान टप्पा-०२ राबविण्यात आला होता.

मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या हस्ते अटल विश्वकर्मा सन्मान योजना विशेष नोंदणी अभियानाचा टप्पा-०२ चे ई- शुभारंभ दि.०४.०७.२०१८ रोजी करण्यात आलेले आहे. सदर ई- शुभारंभ कार्यक्रमास मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री, उर्जा विभाग, राज्य उत्पादन शुल्क तथा पालक मंत्री, नागपूर, मा. श्री. राजकुमार बडोले, मंत्री सामाजिक न्याय विभाग, मंडळाचे मा. अध्यक्ष, मा. प्रधान सचिव, मा. कामगार आयुक्त, मंडळ सदस्य व अधिकारी उपस्थित होते. अभियानात समाविष्ट १२ जिल्हयांचे लोकप्रतिनिधी, अनुलोम संस्थेचे प्रतिनिधी, कामगार संस्थेचे प्रतिनिधी व अधिकारी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारा उपस्थित होते.

विशेष नोंदणी अभियान टप्पा ०२ मध्ये दि.०४.०७.२०१८ ते १४.०८.२०१८ पर्यंत १२ जिल्हयामध्ये नोंदीत झालेल्या बांधकाम कामगारांचा संख्या निहाय जिल्हा निहाय तपशील खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र | जिल्हे | नोंदणीचे लक्षांक | नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | रत्नागिरी | २०,००० | ८८७२ |
| २. | सोलापूर | २५,००० | १४१५० |
| ३. | कोल्हापूर | २५,००० | ६००१ |
| ४. | अहमदनगर | २५,००० | १०९२८ |
| ५. | धुळे/ नंदूरबार | २०,००० | ७८१८ |
| ६. | नांदेड | २०,००० | ९८४९ |
| ७. | परभणी | २०,००० | ९९१२ |
| ८. | हिंगोली | २०,००० | १५३७३ |
| ९. | चंद्रपूर | २५,००० | १०५४८ |
| १०. | गोंदीया | २०,००० | २१४९३ |
| ११. | यवतमाळ | २०,००० | २२८७४ |
| १२. | वाशिम | २०,००० | ५४५६ |
| | | **२,६०,०००** | **१४३२७४** |

मंडळाच्या दि.१८.०७.२०१८ रोजीच्या बैठकीत अटल विश्वकर्मा सन्मान योजना मंजूरीबाबतचा प्रस्ताव माहितीकरीता व मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता.

**अटल विश्वकर्मा सन्मान योजना मंजूरीबाबत :-**

मा. मुख्यमंत्री महोदय महाराष्ट्र राज्य यांनी दि.२३.०२.२०१८ रोजी विशेष नोंदणी अभियानाच्या पहिल्या टप्पयाच्या ई-शुभारंभ प्रसंगी सदर योजनेस **अटल विश्वकर्मा सन्मान योजना** असे नाव संबोधित केले होते.मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत विशेष नोंदणी अभियानाचा टप्पा ०१ पूर्ण झालेला असून टप्पा ०२ प्रगतीपथावर आहे. सदर योजनेंतर्गत पहिल्या टप्पयात ०६ जिल्हयात नोंदणी अभियाना राबविण्यात आले होते तर दुसऱ्या टप्पयामध्ये १२ जिल्हयांचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर अभियान राबविण्यासाठी आवश्यक साहित्य, मोबाईल व्हॅन व अतिरिक्त मनुष्यबळाच्या पुरवठा मंडळ व शासन मान्यतेने नियुक्त केलेल्या संस्थेमार्फत करण्यात येत आहे. सदर अभियानावर पहिल्या टप्प्याकरीता झालेला खर्च, दुसऱ्या टप्प्यातील अपेक्षित खर्च व भविष्यात राबवावयाचा अन्य टप्पयाच्या खर्चाची व्याप्ती विचारात घेता सदर खर्च प्रशाकीय बाबीखाली न नोंदविता स्वतंत्र योजना मंजूर करावी व विशेष नोंदणी अभियानाचा खर्च या योजनेखाली खर्ची टाकण्यात यावा असे प्रस्तावित करण्यात आले होते. अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत विशेष नोंदणी अभियान राबविण्यास व सदर अभियानावरील खर्च अटल विश्वकर्मा सन्मान या योजनेंतर्गत खर्ची टाकण्यास मंडळाच्या मान्यतेस प्रस्ताव सादर करण्यात आला होता.मंडळाने पारित केलेल्या ठरावानुसार योजना मंजूरीबाबतचा प्रस्ताव दि.१९.१०.२०१८ रोजी शासन मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयातील IA NO.१२७७६१ SMW (C) No (s) १/२०१५ सुमोटो याचिकेच्या वेळोवळी झालेल्या सुनावणीअंती दि.१०.१०.२०१८ रोजी मा. सर्वोच्च् न्यायालयाने बांधकाम कामगारांच्या नोंदणी व लाभ वाटपाबाबत खालील प्रमाणे आदेश पारित केले आहेत.

**"We except the state of Maharashtra to complete the registration of building and construction workers, as mentioned in**

**the Note given to us and ensure that necessary benefits are given to the building and construction workers."**

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशानुसार राज्यातील सर्व बांधकाम कामगारांची नोंदणी करून लाभ वाटप करणे अपेक्षित आहे. सदर आदेशास अनुसरून अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत विशेष नोंदणी अभियानाच्या टप्पा ०१ व टप्पा ०२ मध्ये समाविष्ट जिल्हे व नोंदणी व लाभवाटपाबाबतची आवश्यकता विचारात घेऊन उर्वरित जिल्हयामध्ये विशेष नोंदणी अभियानाचा टप्पा -०३ राबविणे अपेक्षित आहे.

अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत विशेष नोंदणी अभियानाचा टप्पा-०३ खालील जिल्हयामध्ये राबविणे प्रस्तावित आहे.

| विभाग | अ.क्र. | जिल्हयाचे नाव | लक्षांक |
|---|---|---|---|
| मुंबई कोकण विभाग | १. | सिंधुदूर्ग | १०००० |
| पुणे | २ | सातारा | १५००० |
| | ३ | सांगली | १५००० |
| नाशिक | ४ | जळगांव | १५००० |
| औरंगाबाद | ५ | औरंगाबाद | १०००० |
| | ६ | जालना | १५००० |
| | ७ | परभणी | १०००० |
| | ८ | नांदेड | १०००० |
| | ९ | लातूर | १५००० |
| | १० | हिंगोली | १०००० |
| | ११ | बीड | १५००० |
| | १२ | उस्मानाबाद | १५००० |
| नागपूर | १३ | वर्धा | १५००० |
| | १४ | भंडारा | ३०००० |
| | १५ | गडचिरोली | १५००० |
| | १६ | अकोला | २०००० |
| | १७ | बुलढाणा | १५००० |
| | एकूण | | २,५०,००० |

सदर अभियान राबविण्यासाठी क्रीडाई, अनुलोम संस्था, बांधकाम कामगार संघटना व या क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांची मदत घेवून शहरी व ग्रामीण भागातील जास्तीत जास्त

बांधकाम कामगारांची नोंदणी मंडळाकडे करणे प्रस्तावित आहे. सदर अभियानात बांधकाम कामगारांच्या नोंदणीशिवाय बांधकाम कामगारांच्या नोदंणीचे नुतणीकरण, प्रलंबित लाभाचे अर्ज निकाली काढणे व नवीन लाभाचे अर्ज स्वीकारणेबाबतही कार्यवाही करणे प्रस्तावित आहे. सदर अभियानाकरीता आवश्यक साहित्य, मोबाईल व्हॅन व अतिरिक्त मनुष्यबळाच्या पुरवठयाकरीता मंडळ व शासनाच्या मान्यतेने यापूर्वीच्या ०२ अभियानात नियुक्त करण्यात आलेल्या मे. अँगल अॅडव्हटायझिंग, पुणे या संस्थेची नियुक्ती पुर्वी मंजूर करण्यात आलेल्या दर, अटी व शर्तीनुसार करावयाचे प्रस्तावित आहे.

यथाप्रस्तावित अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत विशेष नोंदणी अभियानाच्या टप्पा-०३ मध्ये उपरोक्त १७ जिल्हयांमध्ये बांधकाम कामगारांची नोंदणी, मंडळाकडे नोंदीत बांधकाम कामगारांचे नुतनीकरण, प्रलंबित लाभ वाटप व नवीन लाभ वाटपाचे अर्ज स्विकारणे याबाबतच्या कार्यवाहीचा कालावधी, जिल्हानिहाय प्रस्तावित लक्षांक, विशेष नोंदणी अभियानाच्या टप्पा-०३ च्या उदघाटनाचे स्थळ व मे. अँगल अॅडव्हर्टायझिंग, पुणे यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र. ४८(२)/२०१८: अटल विश्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत विशेष नोंदणी अभियान टप्पा-२, चा जिल्हानिहाय बांधकाम कामगारांच्या नोंदणीचा तपशिल मंडळास सादर करण्यात आला. सदर अहवालाची मंडळाकडून नोंद घेण्यात आली. अभियानाच्या टप्पा-०३ माहे १९, नोव्हेंबर, २०१८ ते १८, डिसेंबर, २०१८ या एक महिन्याच्या कालावधीत राबविण्यात यावा. सदर अभियानामध्ये सिंधुदूर्ग, सातारा, सांगली, जळगाव, औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर, बीड, उस्मानाबाद, अकोला, बुलढाणा, वर्धा, भंडारा व गडचिरोली या १७ जिल्हयांमध्ये बांधकाम कामगारांची नोंदणी, मंडळाकडे नोंदीत बांधकाम कामगारांचे नुतनीकरण, प्रलंबित लाभ वाटप व नवीन लाभ वाटपाचे अर्ज स्विकारणे बाबत कार्यवाही करण्यात यावी. अभियानाच्या टप्पा-३ मध्ये १७ जिल्ह्याकरीता २,५०,००० एवढे नोंदणीचे लक्षांक निश्चित करण्यात येत आहे.**

मंडळ व शासन स्तरावरुन अटल विश्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत विशेष नोंदणी अभियानाकरीता मे. अँगल ॲडव्हर्टायझिंग प्रा. लि या संस्थेची नियुक्त करण्यात आली आहे. त्यानुसार मे. अँगल ॲडव्हर्टायझिंग प्रा. लि. यांनी टप्पा-१ व टप्पा -२ करीता साहित्य, प्रमोटर्स, मोबाईल व्हॅन, नोंदणी अर्जाचे स्कॅनिंग व डेटा ऐंट्री करणे व अनुषंगीक बाबींचा पुरवठा केला आहे. त्याचप्रमाणे सदर टप्पा-३ च्या उपरोक्त बाबींच्या पुरवठा मे. अँगल ॲडव्हर्टायझिंग प्रा. लि या संस्थेकडून करण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्रस्तावित अभियानाच्या अपेक्षित अंदाजीत खर्च रु. ८.५० कोटी एवढ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०३ :- प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत बांधकाम कामगारांना ग्रामीण भागाकरीता अर्थसहाय्य मंजूर करणेबाबत.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, राज्यातील इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांसाठी शहरी भागाकरीता प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत अर्थसहाय्य देण्याकरीतेचा प्रस्ताव शासनास मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता. उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने कामगार विभागाने दि.१७.०१.२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती. तसेच, गृहनिर्माण विभागाच्या दि.०३.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजना राबविण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली होती, व सदर योजनेकरीता बांधकाम कामगारांच्या पात्रतेच्या अटी मंडळ व कामगार विभागाने निश्चित करणेबाबत आदेशात नमूद करण्यात आले होते. त्यानुसार, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. २९.१०.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये शहरी भागातील बांधकाम कामगार आवास योजनेतील पात्रता निश्चित करण्यात आलेली आहे. (प्रत संलग्न)

मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देणेबाबतचा प्रस्ताव शासनास मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास शासनाने दि.१७.०१.२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयांना पुढील कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण भागातील नोंदीत बांधकाम कामगारांकरीता लागू करणेबाबत क्षेत्रीय स्तरावर होत असलेली मागणी विचारात घेऊन सदर योजनेच्या अंमबजावणीकरीता योजनेच्या अटी, शर्ती व लाभाची रक्कम निश्चित करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला, उप संचालक राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण विभाग, नवी मुंबई व प्रकल्प संचालक डीआरडीए यांना दि.२३.०८.२०१८ रोजी बैठकीकरीता आमंत्रित करण्यात आली होती.

सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार योजनेच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे ठरविण्यात आलेल्या आहेत.

**योजनेचे नाव:-** नोंदीत बांधकाम कामगारांकरीता प्रधानमंत्री आवास (ग्रामीण) योजनेंतर्गत अर्थसहाय्य देणे.

**लाभार्थीची पात्रता :-**

१. मंडळाकडे नोंदीत व सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सदर अर्थसहाय्य देय राहील.

२. नोंदीत बांधकाम कामगारांचे स्वत:च्या नावे महाराष्ट्र राज्यात पक्के घर (सिमेंट व वाळूने बांधलेले घर) नसावे.

३. प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांतर्गत पात्र नोंदीत बांधकाम कामगारांना मंडळामार्फत योजनेच्या अनुदानाव्यतिरिक्त रू.८०,०००/- एवढा अतिरिक्त अनुदान अनुज्ञेय राहील.

४. ग्रामीण घरकुल योजनेस पात्र परंतु घरकुल बांधण्यासाठी स्वत:ची जागा नसलेल्या बांधकाम कामगार, पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत लाभास पात्र राहील.

५. प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेस लागू असणारे पात्रतेचे सर्व निकष सदरील लाभ घेण्यासाठी लागू राहतील.

६. घरकुलास पात्र लाभार्थीच्या कुटूंबातील कोणताही सदस्य नोंदीत बांधकाम कामगार असल्यास सदर लाभार्थी रू.८०,०००/- अर्थसहाय्य मिळण्यास पात्र राहील. तसेच कुटूंबातील केवळ एकाच व्यक्तीस सदर अर्थसहाय्य देय राहील.

७. एकदा लाभ घेतल्यानंतर बांधकाम कामगार पुनश्च: लाभास पात्र राहणार नाही. तसेच सदर घरकुल पुढील ०५ वर्ष हस्तांतरीत/ विक्री करता येणार नाही तसे रू.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र (Affidavit) सादर करावे लागेल.

**अर्थसहाय्य मिळविण्याची पध्दत:-**

१. राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण विभाग, नवी मुंबई ही संस्था सदर योजनेकरीता समन्वय संस्था (Nodel Agency) म्हणून कार्यरत राहील.

२. नोंदीत बांधकाम कामगारांची जिल्हानिहाय यादी मंडळाकडून उपलब्ध करून देण्यात येईल.

३. नोंदीत बांधकाम कामगार प्रस्तावित योजनेकरीता पात्र ठरविल्यानंतर मंडळाकडून मंजूर अर्थसहाय्याची रक्कम राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण विभाग या संस्थेकडे वर्ग करण्यात येईल.
४. घराच्या बांधकामाच्या प्रगतीनुसार राज्य व्यवस्थापन कक्षाकडून टप्पानिहाय अनुदान बांधकाम कामगारांच्या खात्यावर PFAMS प्रणालीद्वारे वर्ग करण्यात येईल.
५. सदर योजनेची प्रचार प्रसिध्दी मंडळामार्फत केली जाईल व सदर प्रचार प्रसिध्दीचा खर्च अटल विश्वकर्मा सन्मान योजनेवर खर्ची टाकण्यात येईल.

यथाप्रस्तावित नोंदीत बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री आवास (ग्रामीण) योजनेंतर्गत अर्थसहाय्य देणेबाबत लाभाची पात्रता, आवश्यक कागदपत्रे व अर्थसहाय्य वाटपाची रक्कम यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात यावी. मंडळाने मान्यता प्रदान केल्यानंतर शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल असा प्रस्ताव मंडळ बैठकीत सादर करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर योजनेनुसार पात्र लाभ धारकाला अर्थसहाय्य कसे मिळेल यांची माहिती दिली. त्यावर श्री. मगर यांनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांना सदर योजनेमध्ये समन्वय सस्था म्हणून न नेमता सदर योजनेची रक्कम कामगाराच्या बँक खात्यामध्ये थेट वर्ग करण्यात यावी असे नमुद केले. यावर मा. अध्यक्ष यांनी श्री. मगर यांनी नमुद केलेल्या प्रस्तावावर विचार करावा असे सांगितले. त्या नंतर मा. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मा. अध्यक्ष यांना कामगारांना योजनेचे रु. २ लाख कामगारांना कसे मिळतील याबाबतची प्रस्तावित कार्यपध्दती विषद केली.

बैठीस उपस्थित संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष यांनी त्यांच्या मार्फत सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागाकडून मंजूर झालेल्या व सद्यस्थितीत कक्षामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती दिली. मंडळाची प्रधानमंत्री आवास योजना व त्यांची योजना एकत्रित कशा राबविता येवू शकतील याबाबत मा. अध्यक्षांनी विचारणा केली. त्यावर मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी मंडळाने आपल्या नोंदीत सक्रीय (जिवित) कामगारांची यादी कक्षास द्यावी आणि राज्य व्यवस्थान कक्ष आपल्याकडील यादीशी ताळमेळ घेवून त्यांच्याकडील यादीत असलेले व पात्र बांधकाम कामगारांची यादी मंडळाला

पाठवतील व मंडळ स्तरावरुन निधी कक्षाकडे वर्ग करावा लागेल याबाबत स्पष्ट करतांना संचालकांनी खुलासा केला की, आमच्या कक्षामध्ये आगामी तीन ते चार वर्षात वितरीत करावयाच्या अंदाजे १२ लक्ष लाभार्थ्यांची यादी निवडण्यात आली आहे. तथापी सदर निवडलेल्या यादीत नोंदीत सक्रीय (जिवित) बांधकाम कामगार असल्यास सदर बांधकाम कामगारांना योजनेचा लाभ देता येईल अन्यथा लाभ मिळण्यासाठी प्रतिक्षा करावी लागेल. अशी प्रतिक्षा करणे बाबत सर्व मंडळ सदस्यांनी विरोध दर्शविला, मंडळाकडे निधी उपलब्ध असतांना पात्र लाभार्थ्यांना त्वरीत लाभ मिळावा असे मत व्यक्त केले. या संदर्भात सविसतर चर्चेअंती मा. मंत्री महोदयांनी निर्देश दिले की, मंडळाचे सचिव व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष यांनी एकत्र बैठक घेवून आदिवासी विकास विभागाच्या शबरी आदिवासी घरकुल योजना आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या रमाई घरकुल योजनेचा अभ्यास करावा व त्याच धर्तीवर नोंदीत बांधकमा कामगारांसाठी स्वतंत्र योजना तयारी करावी व ग्राम विकास विभागाच्या सहमतीने राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत राबविण्यात यावी. नोंदीत बांधकाम कामगारांना सदर योजनेअंतर्गत रु. २.५० लक्ष एवढे अर्थसहाय्य देण्यात यावे असे प्रतिपादन केले.

योजनेचे उदिष्ट लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी मंडळस्तरावर एक कार्यकारी अभियंता व एम उप अभियंता नेमण्यात यावा व आणखी काय करता येईल हे बघावे असे सांगितले. त्यावर संचालक राज्य व्यवस्थान कक्ष यांनी असे नमुद केले की, सदर योजनेचे उदिष्ट लवकरात लवकर सफल होण्यासाठी ग्रामिण भागामध्ये ग्रामसेवकांना प्रोत्साहन देता येवू शकेल.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते खालील ठरात घेण्यात आला.

**ठराव क्र. ४८(३)/२०१८: प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता आदिवासी विकास विभागाच्या शबरी आदिवासी घरकुल योजना आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या रमाई घरकुल योजनेच्या धर्तीवर स्वतंत्र योजना तयार करावी ग्रामीण भागाकरीता प्रती लाभार्थी रु. २.५० लक्ष ऐवढे अर्थसहाय्य देण्यात यावे. सदर योजना ग्रामविकास विभागाच्या सहमतीने राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत राबविण्यात यावी. सदर योजनेच्या**

कार्यन्वयाकरीता मंडळ स्तरावर सहायक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) या संवर्गातील एक पद निर्माण करावे. सदर पद मंडळामार्फत थेट नियुक्तीने अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात यावे. सदर योजनेच्या लाभार्थी निवडीच्या अटी शर्ती, योजना राबविण्याची पध्दती, अनुदान वितरणाची पध्दत निश्चित करुन योजना मंजूरीचा प्रस्ताव लवकरात लवकर शासन मान्यतेस सादर करण्यात यावा. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र.०४ :- बांधकाम कामगारांच्या पाल्यास पीएच.डी अभ्यासक्रमासाठी तसेच परदेशात उच्च शिक्षण घेण्याकरीता शिष्यवृत्ती देण्याच्या अनुषंगाने योजना तयार करणेबाबत.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाचे सचिवांनी सादर केले की, उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.२९.०९.२०१८ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम कामगारांच्या पाल्यास विद्यावाचस्पती (पीएच.डी.) अभ्यासक्रमासाठी तसेच परदेशात उच्च् शिक्षण घेण्याकरीता शिष्यवृत्ती देण्याच्या अनुषंगाने योजना तयार करणेबाबत सूचित केले आहे. शासनाचे दि.२९.०९.२०१८ चे पत्र नोंदणीकृत बांधकाम कामगारांचे दि.१७.०९.२०१८ चे पत्र व त्यांच्या पाल्याच्या निवेदनाची प्रत सोबत सादर करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी पदव्युत्तर पदवी पर्यंतच्या शैक्षणिक सहाय्याच्या योजना आहेत. तथापि, पीएच.डी अभ्यासक्रमासाठी तसेच परदेशात उच्च शिक्षण घेण्याकरीता शिष्यवृत्तीची कोणतीही योजना नाही. तेव्हा, बांधकाम कामगारांच्या पाल्यास पीएच.डी अभ्यासक्रमासाठी तसेच परदेशात उच्च शिक्षण घेण्याकरीता शिष्यवृत्ती देण्याच्या अनुषंगाने सामाजिक न्याय विभाग व अदिवासी विकास विभागाच्या योजनेच्या धर्तीवर योजना तयार करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

उक्त बाबींच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना पीएच.डी अभ्यासक्रमासाठी तसेच परदेशात उच्च शिक्षण घेण्याकरीता शिष्यवृत्ती देणेबाबतच्या योजनेच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे आहेत

**१. योजनेच्या अटी व शर्ती**

- अर्जदार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदीत असावा व अर्जदाराची नोंदणी मंडळात सक्रिय (जिवीत) असावी.
- अर्जदाराच्या पाल्यांना परदेशातील नामांकित शैक्षणिक संस्था/ विद्यापीठामध्ये प्रवेश मिळालेला असावा.

- अर्जदाराने पाल्याच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) करीता अर्ज करताना यापूर्वी इतर कोणत्याही राज्य शासनाची अथवा केंद्र शासनाची परदेशी शिष्यवृत्ती घेतलेली नसावी.
- परदेशातील विद्यापीठ/ शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पूर्ण वेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा.
- प्रवेशित अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना नमूद केलेल्या विहीत कालावधीत अभ्यासक्रम पूर्ण करणे विद्यार्थ्यावर बंधनकारक असेल, अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ मान्य केली जाणार नाही.

२. **अर्थसहाय्याची रक्कम :-** पी एच.डी अभ्यासक्रमाकरीता परदेशातील नामांकित विद्यापीठात प्रवेश मिळालेल्या नोंदीत बांधकाम कामगारांच्या पाल्यास प्रतिवर्ष रू.२.०० लक्ष प्रमाणे ०४ वर्ष किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रम यापेक्षा कमी कालावधी या वर्षाकरीता अर्थसहाय्य

३. शैक्षणिक अर्हता :-

- पीएचडी अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर परिक्षेत किमान ५५% गुण असणे आवश्यक राहील.

४. अभ्यासक्रमाचा कालावधी :-

- पीएचडी साठी ०४ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी या पेक्षा कमी असेल तो

५. एकाच कुटूंबातील कमाल पात्रता धारक:-

- सदर योजनेचा लाभ कामगाराच्या दोन पाल्यांना घेता येईल.
- सदर शिष्यवृत्ती एकाच वेळेस मान्य करता येईल. एकापेक्षा जास्त वेळेस विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र असणार नाही.

यथाप्रस्तावित योजना राबविण्याबाबत मंडळाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासन मान्यतेअंती पुढील कार्यवाही करण्यात येईल बाबतचा प्रस्ताव मंडळ बैठकीत सादर करण्यसात आला.

सदर विषयाबाबत श्रीम. आगटे, मालक प्रतिनिधी यांनी अर्जदाराला मंडळाची तशी योजना नसल्यामुळे सध्या विशेष बाब म्हणून अर्थसहाय्य देण्यात यावे असे नमुद केले. मंडळाची योजना तयार होईल तो पर्यंत त्याचे शिक्षण पूर्ण झालेले असेल किंवा अर्थसहाय्य न मिळाल्यामुळे त्याचे शैक्षणीक नुकसान झालेले असेल.

यावर मा. प्रधान सचिव यांनी असे नमुद केले की, मंडळ सदस्यांनी सुचविल्यानुसार अर्जदाराला सध्या विशेष बाब म्हणून अर्थसहाय्य देण्यात यावे व नंतर योजना तयार करण्यात यावी. योजनेमध्ये काही अटी घाल्यण्यात याव्यात जसे की, वर्षाला किती अर्जदारांना लाभ द्यावा. त्यामध्ये देशातील शिक्षणासाठी किती आणि परदेशातील शिक्षणासाठी किती आणि अर्थसहाय्य देतांना अर्जदाराला एकदाच पूर्ण रक्कम न देता टप्प्या टप्प्याने देवून पदवी मिळाल्यानंतर काही हिस्सा देण्यात यावा, तशी स्वतंत्र योजना तयार करण्यात यावी. याबाबत मंडळ सचिवांनी खुलासा केला की, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बांधकाम कामगारांकरीता केंद्र शासनाच्या स्तरावर वेळोवेळी बैठका घेवून मॉडेल स्किम तयार करण्यात आलेली आहे. त्यानुसार मंडळाकडील योजनांमध्ये फेरबदल करणे अपेक्षीत आहे. त्यासोबत पीएच.डी अभ्यासक्रमासाठी अर्थसहाय्य प्रस्तावित करण्यात येईल.

सदर विषयावर मंडळाचे अध्यक्ष यांनी उपरोक्त अर्जदाला सध्या रु. २.५ लक्ष रुपये विशेष बाब म्हणून देण्यात यावे असे नमुद केले. मा. मंत्री महोदयांनी सदर प्रसतावाला सहमती दर्शविली व सविस्तर चर्चेअंती खालील प्रमाणे ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

**ठराव क्र. ४८(३)/२०१८: बांधकाम कामगारांच्या पाल्यास पीएच.डी अभ्यासक्रमासाठी तसेच परदेशात उच्च शिक्षण घेण्याकरीता शिष्यवृत्ती देण्याच्या अनुषंगाने योजना तयार करावी. केंद्र शासनाच्या मॉडेल स्किम बाबत प्राप्त निर्देशानुसार मंडळाच्या योजनेत फेरबदल करतांना सदर योजनेचाही अंतर्भाव करावा. तूर्तास कोल्हापूर जिल्ह्यातील नोंदीत बांधकाम कामगार श्री. सुभाष आत्माराव झेंडे यांच्या विनंती नुसार त्यांचे पाल्य श्री. अनिल सुभाष झेंडे यांना**

परदेशातील पीएच.डी. शिक्षणाकरीता रु. २.५ लक्ष एवढे अर्थसहाय्य विशेष बाब म्हणून देण्यात यावे. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०५ :- बांधकाम कामगारांच्या नोंदणीचा डाटा ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध राहण्यासाठी क्लाउड तंत्रज्ञानाचा वापर करणे प्रस्तावित आहे. याकरीता आवश्यक प्रणाली वार्षिक भाडेतत्वावर घेणे व सदर प्रणालीच्या देखभाल दुरुस्ती वरील खर्च मंजूरी बाबत.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत करण्यात येणाऱ्या इमारत व इतर बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध स्वरूपाच्या कल्याणकारी योजनांच्या स्वरूपात त्यांना देण्यात येणारे लाभ याची राज्यस्तरावरील सर्व माहिती संपूर्णपणे संगणकीकृत करण्यात येत आहे. यामुळे नोंदणी प्रक्रिया व लाभ वितरण प्रक्रिया अधिक सक्षम व प्रभावी राबविण्यास मदत होईल. तसेच नोंदणी संदर्भातील माहितीचे राज्यस्तरीय वर्गीकरण करणे सुलभ होईल. नुकत्याच राबविण्यात आलेल्या अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत विशेष नोंदणी अभियान टप्पा-०१ व ०२ दरम्यान संकलित केलेली नोंदणीची माहिती ऑनलाईन स्वरूपातच उपलब्ध आहे. तसेच येत्या काळात प्रशासकीय स्तरावर या प्रणालीचा वापर अधिक व्यापक आणि प्रभावीपणे करण्यासाठी जिल्हा स्तरावरील नोंदणी प्रक्रिया देखील ऑनलाईन स्वरूपात सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी एकात्मिक संगणकीय प्रणाली व्यवस्थापन ची प्रक्रिया देखील सुरू आहे.

ऑनलाईन माहितीच्या कायमस्वरूपी साठवणुकीसाठी आणि त्याचा सातत्याने उपयोग करण्यासाठी क्लाउड तंत्रज्ञानावर आधारित ऑनलाईन साठवण प्रणाली भाडेतत्वावर घेणे क्रमप्राप्त आहे. याशिवाय, या ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध माहितीचे तांत्रिक व्यवस्थापन करणेसाठी त्रयस्थ् संस्थाकडून सेवा उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे. या दोन्ही प्रकारच्या तांत्रिक सेवा/ सुविधा या मासिक/ वार्षिक भाडेतत्वावर उपलब्ध आहेत. भविष्यात संपूर्ण यंत्रणा ऑनलाईन विकसति झाल्यानंतर शासनाने Empanelled केलेल्या संस्थांमधून मंडळाच्या आवश्यकतेनुसार योग्य संस्था निवडून त्यांची सेवा उपलब्ध करून घेता येईल. तोपर्यंत सध्या संपूण माहिती संकलन व प्रणाली विकसति करणेचे काम प्रगतीपथावर आहे. त्या दरम्यान तात्पुरत्या स्वरूपात क्लाऊड सुविधा आणि तांत्रिक व्यवस्थापन सेवा या मंडळाच्या आवश्यकतेनुसार विहीत कार्यपध्दती राबवून त्रयस्थ

संस्थांकडून उपलब्ध करून घेता येईल व भविष्यात आवश्यकतेनुसार त्यामध्ये क्षमतावाढ देखील करता येईल.

सध्याच्या आवश्यकतेनुसार या कामासाठी वार्षिक १५ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. मंडळाची माहिती क्लाऊड तंत्रज्ञानावर आधारित ऑनलाईन साठवण प्रणाली भाडेतत्वावर घेण्यास व प्रणाली देखभाल दुरूस्ती खर्चासह वार्षिक अपेक्षित खर्च रू.१५ लक्ष एवढा खर्चाचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात आला.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र.४८(५)/२०१८: बांधकाम कामगारांच्या नोंदणीचा डाटा ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध राहण्यासाठी क्लाउड तंत्रज्ञानाचा वापर करुन आवश्यक प्रणाली वार्षिक भाडेतत्वावर घेण्यासाठी व सदर प्रणालीच्या देखभाल दुरुस्ती वरील खर्चासह वार्षिक अंदाजित रु. १५ लक्ष एवढ्या खर्चास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र. ६ :- मंडळाच्या मुख्यालयाकरीता हॉलमार्क प्लाझा, ८ वा मजला, बांद्रा (पूर्व), मुंबई येथील जागा भाडेतत्वावर घेण्यास मान्यता प्रदान करणेबाबत.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाचे मुख्यालय सद्य:स्थितीत कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, ई ब्लॉक, सी २०, वांद्रा-कुर्ला संकुल वांद्रे (पूर्व), मुंबई येथे कार्यरत आहे. सदर ठिकाणी उपलब्ध असलेली जागा अधिकाऱ्यांचे दालन व कर्मचारी यांच्याकरिता अपुरी पडत आहे. त्यामुळे मंडळाच्या मुख्यालयाकरिता स्वतंत्र जागा असणे आवश्यक आहे व त्यानुसार मंडळाच्या मुख्यालयासाठी भाडेतत्वावर जागा घेणेबाबतचा ठराव मंडळाच्या दि. १६.०६.२०१६ रोजीच्या बैठकीत पारित झालेला आहे.

दि.१५.०५.२०१७ रोजी मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली परिषद सभागृह, मंत्रालय येथे पार पडलेल्या बैठकीत मंडळाच्या मुख्यालयाकरिता जागेसंबंधी झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास विभागाकडे (MSSDS) मेकर चेंबर, दक्षिण मुंबई येथे १५००० चौ. फुट एवढी जागा उपलब्ध असून त्यामधून मंडळाच्या मागणीनुसार मुख्यालयाकरिता जागा उपलब्ध करुन देता येईल व मंडळास उपलब्ध देण्यात येणाऱ्या जागेच्या क्षेत्रफळानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केलेल्या दरानुसार सदर जागेचे भाडे मंडळामार्फत अदा करण्यात येईल असे मा. मंत्री महोदय (कामगार) यानी निर्देशित केले होते.

त्या अनुषंगाने, मंडळाच्या मागणीनुसार अंदाजे ६१७० चौ. फुट एवढी जागा मेकर चेंबर, दक्षिण मुंबई येथे उपलब्ध करून देण्याबाबतचा मा. प्रधान सचिव (कामगार-७), उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, यांना दि.२५.०५.२०१७ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. दिनांक ०६.०६.२०१७ च्या मंडळ बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**मंडळाच्या मुख्यालयाकरिता कौशल्य विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील जागेमधून भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन घेणेबाबतचा प्रस्ताव दिनांक २५.०५.२०१७ रोजी शासनास सादर केलेल्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मंडळाच्या दि.२५.०५.२०१७ च्या पत्रान्वये मेकर चेंबर येथे जागा उपलब्ध करुन देण्याबाबत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने त्यांच्या दि. ०६.०९.२०१७ च्या पत्रान्वये सदर प्रस्ताव शासनाकडून कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडे सादर केला असता

कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अभिप्रायांच्या अनुषंगाने मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी **"महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या प्रशासकीय कार्यालयासाठी भाडेतत्वावर स्वतंत्र जागा घेण्यात यावी. जागा भाडयाने घेण्यापूर्वी नियमानूसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करावा"** असे निर्देश दिलेले असल्याचे सुध्दा सदर पत्रात नमूद असून शासनाने मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या निर्देशानुसार उचित कार्यवाही करण्याबाबत सुचित केले आहे.

त्याप्रमाणे मंडळास प्रस्तावित केलेल्या ७००० चौ. फुट भाडयाच्या जागे करता दि.२३.१०.२०१७ रोजी ई-निवीदा प्रसिध्द करण्यात आली, सदर ई-निवीदा प्रक्रियेमध्ये ३ निवेदाकारानी सहभाग घेतला होता. तांत्रिक प्रक्रियेत १ निवेदाकाराला अपूर्ण कागद पत्रामुळे बाद करण्यात आले. उर्वरित २ निवेदाकारांनी प्रस्तावित केलेल्या फोर्ट व बॅलार्ड इस्टेट विभागातील दोन भाडयाच्या जागा मंडळाच्या उप समितीने पहाणी केली. सदर समितीने दोन्ही जागा मंडळाच्या उपयोगाकरीता योग्य नसल्याचे अभिप्राय दिले त्यामुळे सदर ई-निविदा रद्द करणेबाबत प्रस्तावित करण्यात आले होते.

मंडळाच्या कार्यालयासाठी प्रस्तावित भाडयाची जागा कामगार आयुक्त कार्यालयापासून साधारणत: १ कि.मी. अंतरावर आहे. सदर उपलब्ध जागांमधून मंडळाच्या मुख्यालयासाठी जागा भाडयाने घेणे प्रस्तावित आहे. सदर जागेची पाहणी करून वाटाघाटीअंती दरमहा भाडे ठरविण्यासाठी मंडळाची समिती गठीत करणे प्रस्तावित आहे. समितीच्या मान्यतेअंती शासन मान्यता प्राप्त करून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

यावर मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी याबाबत मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंडळाच्या मुख्यालयाकरीता भाडेतत्वावर जागा घेण्यासाठी जागेची निवड करावी व एका महिन्याच्या आत जागा घेण्यात यावी, असे निर्देश दिले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव क्र.४७(१३)/२०१८: मंडळाने यापूर्वी राबविण्यात आलेली निविदा प्रक्रिया रदद करण्यात यावी. मंडळाच्या मुख्यालयाकरीता भाडेतत्वावर घ्यावयाची जागा व जागेचे ठिकाण निश्चित करण्यासाठी मंडळाच्या वतीने मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. मा. अध्यक्ष यांनी आगामी ०१ महिन्याच्या आत योग्य जागेची निवड करावी. मा. अध्यक्ष यांनी निवड केलेल्या जागेचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

त्यानूसार मंडळाचे मा. अध्यक्ष यांच्या दि. १७.१०.२०१८ रोजी (प्रत संलग्न)प्राप्त झालेल्या पत्रान्वये हॉलमार्क प्लाझा, ८ वा मजला, बांद्रा (पुर्व), मुंबई येथे प्रत्यक्ष जागेची पाहणी केलेली असून जागेच्या भाडयाबाबत वाटाघाटी करून सदर जागेचे दर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रमाणित करून घेण्याबाबत निर्देशित केलेले आहे. तपशिल खालीलप्रमाणे.

| अनु क्र. | बाब | तपशिल |
|---|---|---|
| १ | **जागेचे ठिकाण** | हॉलमार्क बिझनेस प्लाझा,युनिट नं-८०१, ८ वा मजला, गुरुनानक हॉस्पीटल रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई- ४०० ०५१. |
| २ | **जागेचे क्षेत्रफळ** | ५२५३ चौ.फुट. |
| ३ | **भाडयाचे दर** | १७५ प्रति चौ.फुट. + जी.एस.टी. |
| ४ | **भाडयाच्या दरासाठी जागेचे क्षेत्रफळ (६३% लोडींग )** | ८६६७.४५ चौ.फुट. |
| ५ | **मंडळाच्या मुख्यालयासाठी भाडयाच्या जागेचे कामगार आयुक्त कार्यालयापासूनचे अंदाजे अंतर** | अंदाजे १ कि.मी |
| ६ | **मा. अध्यक्ष यांनी वाटाघाटी** | १७२ प्रति चौ.फुट + जी.एस.टी. |

| | | |
|---|---|---|
| | **करुन निश्चित केलेले भाडयाचे दर** | |
| ७ | **निश्चित केलेल्या दरानूसार प्रति महिना भाडे (GST सह)** | रक्कम रु. १७,५९,१४५/- |
| ८ | **वार्षिक भाडे (GST सह)** | रक्कम रु. २,११,०९,७४०/- |

सदर भाडयाच्या जागेबाबतचे दर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रमाणित करण्यासाठी प्रस्ताव मंडळाच्या दि. १७.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वयें कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उत्तर मुंबई, अंधेरी (प), मुंबई यांजकडे सादर करण्यात आला आहे, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडे प्रमाणपत्र अद्याप अप्राप्त आहे.

तरी, मंडळाच्या मुख्यालयासाठी हॉलमार्क बिझनेस प्लाझा, ८ वा मजला, युनिट नं-८०१, बांद्रा (पुर्व), मुंबई येथील जागा उपरोक्त तपशीलानूसार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भाडे प्रमाणपत्रानूसार भाडेतत्वावर घेण्यासाठी व दरमहा रु. १७,५९,१४५/- (GST सह) भाडे (वार्षिक रु. २,११,०९,७४०/- GST सह) अदा करणेबाबत मंडळाच्या मान्यतेस्तव सादर.

मंडळाच्या मान्यतेअंती शासन मान्यता प्राप्त् करून सदर जागा मालकासोबत प्रथम ३ वर्षासाठी करारानामा करण्यात येईल.

सदर विषयावर मा. प्रधान सचिव यांनी हॉलमार्क प्लाझा, ८ वा मजला, बांद्रा (पूर्व), मुंबई येथील जागेच्या भाडे फार जास्त आहे. जागेच्या भाड्यावर वार्षिक रु. २.११ कोटी खर्च करण्याऐवजी मंडळाने स्वत:ची जागा खरेदी करणे योग्य राहील असे मत व्यक्त केले. त्यावर मंडळ अध्यक्षांनी सुचित केले की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे भाडे प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भाडे प्रमाणपत्राच्या आधारे काही दिवसांकरीता मंडळाच्या मुख्यालयाकरीता यथाप्रस्तावित जागा भाड्याने घ्यावी याबाबत मा. मंत्री महोदयांनी निर्देश दिले की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भाडे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा. तसेच बेलापूर, बाद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, नरीमन पॉईट या भागात किंवा अन्य सोईच्या ठिकाणी मंडळाच्या मुख्यालयाकरीता खरेदी तत्वावर जागा उपलबधतेबाबत शोध घ्यावा.

त्यानुसार सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र.४८(६)/२०१८: मंडळाच्या मुख्यालयाकरीता हॉलमार्क प्लाझा, ८ वा मजला, बांद्रा (पूर्व), मुंबई येथील जागा भाडेतत्वावर घेण्याकरीता जागेच्या भाड्याचे प्रमाणपत्र सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करावी. दरम्यान मंडळाच्या मुख्यालयाकरीता खरेदी तत्वावर योग्य जागेचा शोध घेण्यात यावा. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र. ०७ :- मंडळाच्या जिल्हा कामगार सुविधा केंद्रासाठी कामगार कल्याण मंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था/निमशासकीय संस्था किंवा खाजगी व्यक्तीकडून जागा भाड्याने घेणेबाबत.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र. इबांका-२०१७/प्र.क्र.४२२/काम-७ दि. ०७.०२.२०१८ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व असंघटीत कामगार मंडळ या दोन्ही मंडळामार्फत बांधकाम कामगार/ असंघटीत कामगारांची नोंदणी व कल्याणकारी योजनांचा लाभ देणेसाठी सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच, सदर सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी ई-निविदा पध्दतीने संस्था निश्चितीसाठी मंडळामार्फत प्रस्तावित RFP डॉक्युमेटसला शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. त्यास अनुसरून ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे. प्रस्तावित ई-निविदेमध्ये ०६ प्रादेशिक कार्यालयांकरीता १८०० चौ.फुट (प्रादेशिक कार्यालये व त्या जिल्हातील कामगार सुविधा केंद्र) व अन्य जिल्हयातील ३५ कामगार सुविधा केंद्राकरीता १२०० चौ.फुट जागेची आवश्यकता आहे.

मा. प्रधान सचिव (कामगार विभाग) यांच्या दालनात दि.०७.०४.२०१८ रोजी संपन्न बैठकीत मंडळाकरीता प्रस्तावित मुख्यालय, ०६ प्रादेशिक कार्यालये व ३५ जिल्हा कार्यालयांकरीता आवश्यक जागा मंडळामार्फत उपलब्ध करून देणेबाबत निर्णय घेण्यात आला. मंडळाच्या प्रस्तावित क्षेत्रिय कार्यालयाकरीता जागा उपलब्धतेबाबत चर्चेअंती महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, उद्योग भवन, प्रशासकीय इमारत, शासनाचे विविध विभाग, जिल्हा परिषद इत्यादीकडे उपलब्ध जागेबाबत माहिती प्राप्त करून बांधकाम कामगारांच्या सुविधा केंद्राकरीता योग्य जागेची निवड करण्यात यावी असे ठरले.

उपरोक्त निर्देशास अनुसरून महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे उपलब्ध इमारत/ जागेचा तपशील प्राप्त करण्यात आला. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मुख्यालयात काम करणाऱ्या सेवा निवृत्त अधिकाऱ्यांची सहा पथके तयार करण्यात आली, त्यांनी सहा महसुली विभागातील जिल्हा पातळी वरील कामगार कल्याण मंडळाच्या केंद्रांना भेट दिली आणि सहा विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी जिल्हा

कार्यालयांसह जिल्हा कामगार सुविधा केंद्रांची विभागीय कार्यालये स्थापन होऊ शकतात का तसेच प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी विभागीय कामगार सुविधा केंद्रे स्थापन होऊ शकतात का याची तपासणी करण्यात आली.

अ) **कामगार कल्याण मंडळाकडून उपलब्ध होऊ शकणाऱ्या जागा.**

| अ. क्र. | ठिकाण | कामगार कल्याण मंडळ कार्यालयांचे पत्ते | उपलब्ध जागेचे क्षेत्रफळ चौ.फु. अंदाजे |
|---|---|---|---|
| १. | पुणे विभागीय कार्यालय | संचेती हॉस्पीटल जवळ, शिवाजीनगर | ११०० |
| २. | पिंपरी – चिंचवड | संभाजी नगर | ११५० |
| ३. | इचलकरंजी | भाग्यश्री कॉलनी, सम्राट अशोक नगर | १४०० |
| ४. | सोलापूर | दमाणी नगर | १२०० |
| ५. | अमरावती विभागीय कार्यालय | छाबडा प्लॉट | २००० |
| ६. | अकोला | डाबकी रोड, भीम नगर | १२०० |
| ७. | नागपूर विभागीय कार्यालय | इंदोरा | १२०० (जागा अपुरी) |
| ८. | औरंगाबाद विभागीय कार्यालय | कोतवालपूरा, सिद्धार्थ उद्यान | १८०० |
| ९. | नांदेड | लेबर कॉलनी | १२०० |
| १०. | जालना | फुलंब्रीकर नाट्यगृहा जवळ | १२०० |
| ११. | परभणी | कांद्राबाद प्लॉट | १२०० |
| १२. | मुंबई (शहर) | जांबोरी मैदान वरळी | ८०० |
| १३. | मुंबई (पूर्व) | कन्नमवार नगर -२ विक्रोळी पूर्व | ९०० |

## ब) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळांच्या जागा

आपल्या मंडळाच्या सहा पहाणी पथकांनी केलेल्या विभाग निहाय दौऱ्यांमध्ये असे आढळले की सातारा, कोल्हापूर, सांगली, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, वाशिम, अहमदनगर आणि हिंगोली येथे कामगार कल्याण मंडळाकडे आपल्या मंडळाच्या जिल्हा कामगार सुविधा केंद्रांसाठी उपयुक्त स्वरुपाच्या जागा उपलब्ध नाहीत. तसेच मंडळाची केंद्रे भाडेतत्वावरील जागांमध्ये कार्यरत आहेत. अशा स्थितीत अन्य शासकीय जागा उपलब्ध होऊ शकतात का याचा पहाणी पथकांनी शोध घेतला. या शोधात खालील ठिकाणी शासकीय कार्यालये /निमशासकीय कार्यालये /महामंडळांच्या जागा उपलब्ध होऊ शकतात असे आढळले. त्यांची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

| अ. क्र. | ठिकाण | जिल्हा कामगार सुविधा केंद्राकरिता जागा उपलब्ध करुन देऊ शकणाऱ्या शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळांची नावे | उपलब्ध जागेचे क्षेत्रफळ चौ.फु. अंदाजे |
|---|---|---|---|
| १. | सातारा | दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटींग फेडरेशन लि. | १३४७ |
| २. | कोल्हापूर | कोल्हापूर महानगर पालिकेची शाहूपूरी व्यापारी पेठ येथील बंद असलेली शाळा (प्रस्तावित करणे आहे) | १२०० |
| ३. | सांगली | सांगली महानगर पालिकेची बंद असलेली कोणतीही शाळा (प्रस्तावित करणे आहे) | १२०० |
| ४. | नाशिक (विभागीय कार्या + जि.का.के.) | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची उद्योग भवन, सातपूर, नाशिक येथील जागा | २२१० |
| ५. | धुळे | धुळे महानगर पालिका यांचे सुधारीत शहर क्षयरोग नियंत्रण कार्यालय, धुळे | १२०० |
| ६. | नंदुरबार | नंदुरबार नगर परिषदेचे लोकनेते बटेसिंहभय्या रघुवंशी व्यापारी संकुल | १२०० |
| ७. | जळगांव | जळगांव महानगर पालिका यांचे वल्लभदास वालजी म्युनिसिपल मार्केट | २१३९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | वाशिम | वाशिम नगर परिषदेचे जुने कार्यालय | १२०० |
| ९. | हिंगोली | हिंगोली जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय नव्या जागेत स्थलांतरीत झाल्यामुळे त्यांचे रिक्त कार्यालय | १२०० |
| १०. | अहमदनगर | जिल्हा सत्र न्यायालयातील रिक्त कार्यालय | १२०० |

उपरोक्त सर्व जागांविषयी संबंधित शासकीय कार्यालये/निमशासकीय कार्यालये /महामंडळांकडे सविस्तर प्रस्ताव पाठविण्यात येत आहेत. त्यांच्याकडून शक्यता अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित शासकीय कार्यालये/निमशासकीय कार्यालये /महामंडळांशी भाडेतत्वावर जागा निहाय करार करण्यात येईल.

क) **खाजगी मालकीची जागा**

पाहणी पथकाच्या दौऱ्यांमध्ये असे आढळले की, पालघर, कल्याण, पनवेल(रायगड), सिंधुदुर्ग, रत्नागिरी, भिवंडी, ठाणे, यवतमाळ, वाशिम, गोंदिया, गडचिरोली, भंडारा, वर्धा व जालना या ठिकाणी कामगार कल्याण मंडळाकडे आपल्या मंडळाच्या जिल्हा कामगार सुविधा केंद्रांसाठी उपयुक्त स्वरुपाच्या जागा उपलब्ध नाहीत. सदर ठिकाणी कामगार कल्याण मंडळाच्या स्वत:च्या जागा नाहीत तसेच त्यांची केंद्रे भाडेतत्वावरील जागांमध्ये कार्यरत आहेत. अशा स्थितीत अन्य शासकीय जागा उपलब्ध होऊ शकतात का याचा पहाणी पथकांनी शोध घेतला. परंतु सदर १४ ठिकाणी शासकीय कार्यालये/निमशासकीय कार्यालये /महामंडळांच्या जागा सुद्धा उपलब्ध नाहीत असे निदर्शनास आले. त्यामुळे सदर १४ ठिकाणी खाजगी जागामालकांकडून जागा घेण्याशिवाय पर्याय नाही असे आढळून आले. या १४ ठिकाणी पाहणी पथकांनी जागा पाहिल्या असून त्या जिल्हा कामगार सुविधा केंद्रे स्थापन करण्यासाठी योग्य आहेत. संबंधित जागा मालकांशी पाहणी पथकांनी प्राथमिक बोलणी केली आहेत. हे सर्व जागा मालक आपल्या जागा सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या दराने भाडे तत्वावर देण्यासाठी तयार असल्याचे भेटीदरम्यान स्पष्ट झाले. त्यानुसार त्यांच्याकडून लेखी सहमती पत्र आणि अन्य अटी व शर्तींचा प्रस्ताव मागवण्यात येत आहे. त्यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संबंधित जागा मालकांशी भाडेतत्वावर जागा निहाय करार करण्यात येईल. या खाजगी जागांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठिकाण | जिल्हा कामगार सुविधा केंद्राकरिता खाजगी जागा उपलब्ध करुन देऊ इच्छिणाऱ्या जागा मालकांची नावे व पत्ते | उपलब्ध जागेचे क्षेत्रफळ चौ.फु अंदाजे |
|---|---|---|---|
| १. | पालघर | श्री. कृपालसिंह रावत ५, जमुना अपार्टमेंट, दलाल टॉवर, भीम नगर, बोईसर (प.) ता.जि. पालघर. | १२०० |
| २. | कल्याण | श्री. रमेश शेट्टी, २ रा मजला, झोझावाला कॉम्प्लेक्स, रामदेव हॉटेल जवळ, आग्रा रोड, कल्याण (प.) | ११०० |
| ३. | पनवेल (रायगड) | डॉ. जयंत धैर्यशील खताळ श्री. गणेश प्लाझा, फेज १ पहिला मजला, प्लॉट क्र. १, सेक्टर १, खांदा कॉलनी, न्यु पनवेल | १२०० |
| ४. | सिंधुदुर्ग | श्री. दिलीप विश्वनाथ खडपकर खडपकर कॉम्प्लेक्स, ओरोस फाटा, सिंधुदुर्ग नगरी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | १२०० |
| ५. | रत्नागिरी | डॉ. अमेय रमेश आमोणकर अरिहंत स्पेस सेंटर, दुसरा मजला, लोटलीकर हॉस्पिटलच्या शेजारी, मारुती मंदीर, रत्नागिरी | १०५९ |
| ६. | भिवंडी | श्री. मनिष गुप्ता वरदान प्लाझा, कल्याण भिवंडी रोड, टेमघर, ता. कल्याण जि. ठाणे | १२०० |
| ७. | ठाणे | श्री. प्रशांत रत्नाकर भानुशाली २०१, श्रीधर स्मृती सोसायटी, देवधर हॉस्पिटलच्या जवळ, गोखले रोड, ठाणे पश्चिम | १६५० |
| ८. | गोंदीया | श्री. धनराज राधाकिशन आहुजा जे. आर. कॉम्प्लेक्स, श्री टॉकीज रोड, अनसारी वॉर्ड, गोंदीया - ४४१६०१ | १२०० |
| ९. | गडचिरोली | श्री. अमोल दादाजी निकुरे कोटगल रोड, टि-पॉईंट चौक, सावरी हनुमान मंदीराजवळ, प्लॉट नं. १, वॉर्ड नं. ३, गडचिरोली - ४४२६०५ | १२०० |
| १०. | भंडारा | श्री. विजय यादवराव साकुरे विदर्भ हौसिंग कॉलनी, प्लॉट नं. ७, तकिया वॉर्ड, भंडारा - ४४१९०४ | १२०० |
| ११. | वर्धा | श्री. चंद्रशेखर राठी रामनगर, भगतसिंग पुतळयाजवळ, वर्धा | १२०० |
| १२. | जालना | श्री. अब्दुल हफिज दुसरा मजला, मुक्तेश्वर व्दार, कामगार न्यायालयाजवळ, जालना | १२०० |
| १३. | अमरावती | श्री. नविन कुमार जैन वॉलकट कम्पाऊंड, शेषांचल | १८८२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | निवास, धर्मादाय कॉटन फंड जवळ, इरविन रोड, अमरावती (जर कामगार कल्याण मंडळाकडून जागा उपलब्ध झाली नाही तर सदर खाजगी जागेचा विचार करण्यात येईल) | |
| १४. | यवतमाळ | श्री. रा.दे.गुल्हाने ४६, सत्यनारायण नगर, मिर्झा सर्विसिंग सेंटर जवळ, अरणी रोड, यवतमाळ - ४४५००१ | १५०० |

कामगार कल्याण मंडळ, शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळे तसेच खाजगी जागा मालकांकडून उपलब्ध होऊ शकणाऱ्या जागा अशा या जागांचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या दराने ठरविण्यात येईल तसेच सदर करार पाच वर्षांसाठी असेल. उपरोक्त सर्व जागा पक्क्या बांधकाम केलेल्या असून आपल्या मंडळास कोणत्याही जागेचे बांधकाम करावे लागणार नाही. फक्त अंतर्गत सजावट, विद्युतविषयक बाबींची पूर्तता, आवश्यक सिव्हिल कामे, फर्निचर, रंगरंगोटी आणि केबिन उभारणी ही कामे आपल्या मंडळास करावी लागणार आहेत. त्यानुसार भाडे करार करण्यात येईल.

कामगार कल्याण मंडळाकडून उपरोक्त (अ) येथे नमुद जागांविषयी अंतिम अहवाल मागविण्यात आला आहे. तो प्राप्त झाल्यानंतर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

कोकण विभागीय कार्यालय, मुंबई (पश्चिम), बुलढाणा, बीड, लातूर आणि उस्मानाबाद या सहा कार्यालयांसाठी अद्याप जागा उपलब्ध होऊ शकली नाही. जागा उपलब्धते नंतर सदर ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या दराने भाडेतत्वावर करारनामा करण्याचे प्रस्तावित आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, खालील प्रमाणे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

१) कामगार कल्याण मंडळाकडून उपरोक्त (अ) येथे नमुद तपशिलानुसार ४ जागा विभागीय कार्यालयांसाठी आणि ९ जागा जिल्हा कामगार सुविधा केंद्रासाठी भाडेतत्वावर घेण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात यावी.

२) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळांकडून उपरोक्त (ब) येथे नमुद तपशिलानुसार १० जागा जागा जिल्हा कामगार सुविधा केंद्रासाठी भाडेतत्वावर घेण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात यावी.

३) खाजगी जागा मालकांकडून उपरोक्त (क) येथे नमुद तपशिलानुसार १४ जागा जिल्हा कामगार सुविधा केंद्रासाठी भाडेतत्वावर घेण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात यावी.

४) कोकण विभागीय कार्यालय, मुंबई (पश्चिम), बुलढाणा, बीड, लातूर आणि उस्मानाबाद या सहा कार्यालयांसाठी जागा उपलब्ध झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दराने त्या भाडेतत्वावर घेण्यासाठी मान्यता प्रदान करावी.

कामगार कल्याण मंडळ, शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळे आणि खाजगी जागा मालक यांच्याकडून प्राप्त होऊ शकणाऱ्या उपरोक्त जागा तसेच कोकण विभागीय कार्यालय, मुंबई (पश्चिम), बुलढाणा, बीड, लातूर आणि उस्मानाबाद या सहा कार्यालयांसाठी जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दराने ५ वर्षांसाठी भाडेतत्वावर घेण्यासाठी मान्यता प्रदान करावी.

सदर विषयावर सविस्तर चर्चेअंती खालील ठराव घेण्यात आला

**ठराव क्र. ४८(७)/२०१८: जिल्हा कामगार सुविधा केंद्रांसाठी १२०० चौ.फूट व मंडळाच्या विभागीय कार्यालयांसाठी (जिल्हा कामगार सुविधा केंद्रांसह) १८०० चौ.फूट जागेची आवश्यकता आहे. मंडळाने नेमलेल्या पथकांच्या पाहणी अहवालानुसार कामगार कल्याण मंडळ/शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळे/ अन्य स्वायत्त मंडळे/ खाजगी जागा मालक यांच्याकडून उपलब्ध होऊ शकणाऱ्या जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भाडे प्रमाणपत्रानुसार आगामी ५ वर्षांसाठी भाडेतत्वावर घेण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात येत आहे. अंतर्गत सजावट, विद्युतविषयक बाबींची पूर्तता, आवश्यक सिव्हिल कामे, फर्निचर, रंगरंगोटी आणि केबिन उभारणी ही कामे मंडळामार्फत ई-निविदा पध्दतीने स्वतंत्र संस्थेची निवड करुन करण्यात येणार आहे. नियुक्त संस्थेकडून प्रस्तावित कामे करावयास काही कालावधी लागेल तो पर्यंत आवश्यक फर्निचर व कार्यालयीन साहित्य दरम्यानच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

भाड्याच्या जागेबाबत करावयाच्या करारनाम्याच्या अटी शर्ती वकीलाकडून निश्चित करण्यात याव्यात. त्याकरीता आवश्यक वकील फी अदा करण्यात यावी. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भाडे प्रमाणपत्रानुसार मंडळाच्या वतीने सचिव तथा मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी संबंधीत संस्था/व्यक्ती सोबत जागा भाड्याने घेणेबाबतचा रितसर करारनामा करावा. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०८:- केंद्र शासनामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या मॉडेलस्कीमचे प्रारुप मंडळास माहितीकरीता सादर करणे.**

मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र.३१८/२००६ व अवमान याचिका क्र.५२/२०१३ च्या सुनावणी अंती मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.१९.०३.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेश व सदर आदेशातील Special Direction व General Direction बाबतचा अहवाल मंडळाच्या दि.२२.०५.२०१८ रोजीच्या ४६ व्या बैठकीत सादर करण्यात आला होता.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरून बांधकाम कामगारांची नोंदणी, आस्थापना नोंदणी, उपकर जमा करणे, कल्याणकारी योजनांचे मॉडेल तयार करणे व सोशल ऑडीट करणे या मुद्यांवर विचारविनिमय करणे व निर्णय घेण्यासाठी केंद्र शासनाच्या दिनांक २४.०४.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सहसचिव व संचालक (कामगार कल्याण) केंद्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली विविध राज्यातील प्रधान सचिव (कामगार), भारतीय मजूर संघाचे प्रतिनिधी, क्रीडाईचे प्रतिनिधी, नॅशनल कॅम्पीयन कमीटी फॉर सेंट्रल लेझिसलेशन कन्सट्रक्शन लेबर व आय. एल. ओ. चे प्रतिनिधी यांचीसमिती स्थापन करण्यात आली असून सदर समितीची बैठक दिनांक १०.०५.२०१८, दिंनाक १६.०५.२०१८, दि.३१.०८.२०१८ व दि.१०.०९.२०१८ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीतील चर्चेअंती घेण्यात आलेल्या निर्णयानुसार केंद्र शासनाने पारित केलेल्या दि.२५.०९.२०१८ रोजीच्या आदेशाची प्रत सोबत सादर करण्यात येत आहे. सदर आदेशान्वये बांधकाम कामगारांची नोंदणी, आस्थापना नोंदणी, उपकर जमा करणे, कल्याणकारी योजनांचे मॉडेल तयार करणे व सोशल ऑडीट करणे या संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबतचे निर्देश केंद्र शासनाकडून निर्गमित करण्यात आलेले आहे, कृपया अवलोकन व्हावे.

केंद्र शासनाच्या उपरोक्त दि.२५.०९.२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेले निर्देश व मंडळ स्तरावरून केलेली/ करण्यात येत असलेली कार्यवाही याबाबतचा अहवाल केंद्र शासनास सादर करण्यात येईल व मंडळाच्या आगामी बैठकीत मंडळास अवगत करण्यात येईल.

उपराकत् विषयी सविस्तर चर्चेअंती खालील प्रमाणे ठराव घेण्यात आला.

ठराव क्र.४७(९)/२०१८: मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केंद्र शासनाच्या स्तरावर तयार करण्यात आलेल्या मॉडेल स्किम बाबतचे निर्देश केंद्र शासनामार्फत दि. २५/०९/२०१८ च्या पत्रान्वये मंडळास प्राप्त झालेले आहेत सदर निर्देशाची मंडळामार्फत नोंद घेण्यात येत आहे. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०९:- मा. सर्वोच्च न्यायालयातील IA NO.१२७७६१ SMW (C) पारित केलेले आदेश व त्यास अनुसरून मंडळाने करावयाच्या प्रस्तावित कायवाहीबाबत.**

मंडळ सचिवांनी सादर केले की,

**मा. सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी दि. ०५.०९.२०१८ :-**

मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र. IA NO.१२७७६१ SMW (C) No.(s)१/२०१५ च्या अनुषंगाने दि.०५.०९.२०१८ रोजीच्या सुनावणीअंती मा. सर्वोच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

" We would like to have the details of steps being taken in the Building and Other Construction workers' welfare Cess Act, 1996, particularly with regard to Mumbai."

सदर आदेशाच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत उपकर निधीचा विनियोगाबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती दि.११.०९.२०१८ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयांत सादर करण्यात आली होती.

**मा. सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी दि. ११.०९.२०१८ :-**

मा. सर्वोच्च न्यायालयात दि. ११.०९.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उपनगर कार्यक्षेत्रातील खालील मुद्यांबाबतची माहिती सादर करणेबाबत निर्देशित केलेले होते.

1. How many builders are registered?
2. How many contractors are registered?
3. Number of construction works going on in entire Mumbai
4. How many workers are working on these construction sites?
5. How many are registerd with Maharashtra Building and other construction worker's welfare (MBOWW) Board?
6. How many workers are issued registration cards by MBOCWW Board?

उक्त माहितीस अनुसरून मा. सर्वोच्च न्यायालयांत दि. १९.०९.२०१८ माहिती सादर करण्यात आली होती.

**मा. सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी दि. १९.०९.२०१८ :-**

मा. सर्वोच्च न्यायालयात दि.१९.०९.२०१८ रोजी सादर केलेल्या माहितीमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) यांनी सादर केलेल्या माहितीनुसार एकूण २३१३ कामे प्रगतीपथावर आहे. सदर कामावर झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण वगळून ५३,२७० एवढे बांधकाम कामगार काम करीत असून मुंबई शहर, मुंबई उपनगर पूर्व व मुंबई उपनगर पश्चिम या जिल्हा कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात ४८,४८८ कामगार नोंदीत असल्याचे कळविण्यात आलेले होते. दि.१९.०९.२०१८ रोजीच्या सुनावणीमध्ये विविध कामावर कार्यरत बांधकाम कामगार (५३२७०) व मंडळाकडे नोंदीत बांधकाम कामगार यांच्यातील तफावतीबाबतची कारणमीमांसा सादर करणेबाबत निर्देश दिले.

**मा. सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी दि. २६.०९.२०१८ :-**

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.२६.०९.२०१८ रोजीच्या सुनावणीमध्ये उपरोक्त बांधकाम कामगारांची नोंदणी न होणेबाबत कारणमीमांसा सादर करण्यात आली. यामध्ये अधिनियमामधील वयाची अट, नोंदणीकरीता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न होणे, बांधकाम कामगाराच्या कामाच्या ठिकाणी सतत बदलत राहणे याबाबत सविस्तर कारणमीमांसा सादर करून बांधकाम कामगाराकडून नोंदणीबाबतची पूर्तता करून अनोंदीत बांधकाम कामगारांची नोंदणी मंडळाकडे करण्यासाठी मंडळ आवश्यक कार्यवाही करेल. असा अहवाल मा. सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आला होता.

तथापि, मा. सर्वोच्च् न्यायालयाने दि. २६.०९.२०१८ रोजी स्वतंत्र आदेश पारित केले (प्रत संलग्न) सदर आदेशान्वये ज्या बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली नाही अश्या अंदाजित ५००० बांधकाम कामगार काम करीत असलेल्या ठेकेदारांचा/ विकासकांचा शोध घेऊन त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. तसेच, झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) प्राधिकरणास त्यांच्या आखत्यारीतील गृहनिर्माण संस्थांनी नियुक्त केलेल्या ठेकेदारांकडे कार्यरत बांधकाम कामगारांची नोंदणी झाल्याची खात्री करून अहवाल सादर करण्याबाबत निर्देश दिले. याशिवाय बांधकाम कामगारांच्या नोंदणीबाबत जबाबदारी आस्थापना/ ठेकेदार/ कंत्राटदार/राज्य शासन यांची आहे असे आदेश पारित केले.

**मा. सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी दि. १०.१०.२०१८ :-**

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.२६.०९.२०१८ रोजीच्या निर्देशासनुसार मुंबई शहर, मुंबई उपनगर पूर्व, मुंबई उपनगर पश्चिम या कार्यालयात दि.२६.०९.२०१८ ते ०८.१०.२०१८या कालावधीत झालेली नोंदणी व नोंदणीकरीता प्राप्त अर्जांचा तपशील सादर करण्यात आला व नोंदणीकरीता प्राप्त अर्जांची छाननी करून बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात येईल असेही स्पष्ट करण्यात आले होते.

मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये मंडळामार्फत सादर करण्यात आलेली माहिती, बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) यांनी सादर केलेल्या माहितीचे अवलोकन करून पारित केलेल्या आदेशाची प्रत सोबत सादर.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये मंडळाशी संबंधित खालीलप्रमाणे आदेश देण्यात आलेले आहेत.

"We except the state of Maharashtra to complete the registration of building and construction workers' as mentioned in the note given to us and ensure that necessary benefits are given to the building and construction workers"

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशानुसार कामगार उप आयुक्त, मुंबई शहर, मुंबई उपनगर पूर्व व मुंबई उपनगर पश्चिम यांना नोंदणीकरीता सादर अर्जांचे छाननी करून नोंदणीबाबतची कार्यवाही करण्यात यावी व नोंदीत जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांनी लाभ वाटपाकरीता सादर केलेल्या अर्जांची तातडीने छाननी करून लाभवाटपाबाबत कळविण्यात आलेले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयात वेळोवेळी झालेली सुनावणी व मा. सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेले आदेश मंडळाच्या माहितीकरीता व उचित निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र.४९(९)/२०१८ : मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र. 1A NO.१२७७६१ SMW (C) No.(s)१/२०१५ च्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयात वेळोवेळी झालेली सुनावणी व मा. सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेले**

आदेशास अनुसरुन मंडळ स्तरावरुन सादर करण्यात आलेली माहिती व केलेल्या कार्यवाहीची मंडळाकडून नोंद घेण्यात येत आहे. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र. १० :- मंडळावर नियुक्त e- Gov चे सल्लागार मे. केपीएमजी यांच्या मासिक मोबदल्याचे सुधारित दर मंजूर करणेबाबत.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाच्या दि.१८.०७.२०१८ रोजीच्या बैठकीत मे. केपीएमजी यांच्या मासिक मोबदल्याचे सुधारित दर मंजूर करणेबाबतचा प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर करण्यात आलेला होता.

मे. केपीएमजी या संस्थेच्या नेमणूकीबाबत मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

"मंडळांतर्गत कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली बाह्ययंत्रणेमार्फत तयार करुन घेणेबाबत तयार करण्यात आलेले RFP Document व ई-निविदा रद्द करण्यात यावी. मंडळामार्फत नियुक्त करण्यात आलेले IT Consultant मे. अर्न्स्ट ॲन्ड यंग एल पी पी यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी. त्याऐवजी KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात यावी व त्यांचेकडून सदर कामाचे नव्याने RFP Document तयार करून घेण्यात यावे. नव्याने तयार करण्यात आलेल्या RFP Document मंडळाचे बैठकीसमोर ठेवून त्यावर चर्चा करून त्यास मंडळाची मान्यता घेवून पुन्हा मंडळ स्तरावर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला."

दि.२३.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मे. केपीएमजी यांनी यांनी अतिरिक्त मनुष्यबळाची मागणी केली होती त्या मागणीस अनुसरून मंडळाच्या बैठकीत शासन निर्णयातील मुदत व वेळोवेळी प्राप्त होणारी मुदतवाढ विचारात घेऊन नेमणूकीचे आदेश देण्यात यावेत, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. त्यानुसार मे. केपीएमजी यांना अतिरिक्त मनुष्यबळ नियुक्त करून पुढील कार्यवाही करण्याबाबत दि.१३.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित करण्यात आलेले होते.

माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णयाची मुदत दि.३० जून २०१७ रोजी संपली असल्याने मंडळाच्या इतर योजनांच्या RFP डॉक्युमेंटस बनविण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. याबाबी विचारात घेऊन मे. केपीएमजी यांना शासन माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील निविदा प्राक्रिया पूर्ण होईपर्यंत अथवा ०१ जुलै २०१७ पासून पुढील ०६ महिन्यांकरीता मुदत वाढ दि.१८.०७.२०१७ रोजीच्या बैठकीत देण्यात आली होती.

माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०९.१०.२०१७ रोजीच्या शासन आदेशान्वये दि.३०.०९.२०१७ पूर्वी नियुक्त केलेल्या सल्लगार संस्थेस दि.३१.०३.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

मंडळाच्या बैठकीत नवीन योजना राबविणेबाबत वेळोवेळी पारित केलेले ठराव व सदर योजनांना शासन स्तरावरून प्राप्त मान्यतेस अनुसरून करावयाच्या कार्यवाहीकरीता मे. केपीएमजी या सल्लागाराची सेवा यापुढेही आवश्यक असल्याने मे. केपीएमजी या सल्लागार संस्थेच्या नेमणूकीस माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०९.१०.२०१७ च्या शासन आदेशान्वये दि.३१.०३.२०१८ पर्यंत मुदताढ देणेबाबत मंडळाच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

त्यानुसार मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी मंडळाच्या दि.०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीत मंडळाच्या योजनांचे RFP तयार होईपर्यंत मे. केपीएमजी यांना मुदत वाढ देण्यात यावी असे सुचविले. याबाबत मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी दिनाक ३१ मार्च २०१९ पर्यंत मुदत वाढ देण्यात यावी असे प्रस्तावित केले होते. त्यानुसार मे. केपीएमजी यांना दि.३१ मार्च २०१९ पर्यंत मुदतवाढीबाबत मंडळ बैठकीत ठराव पारित करण्यात आला होता व त्यानुसार मे. केपीएमजी यांना मुदतवाढ देण्यात आली आहे.

माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०१.०७.२०१४ रोजीचा शासन निर्णयातील सल्लागाराचे दर दि.२०.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये दर सुधारित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार मे. केपीएमजी यांना देय रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे

| दि.०१.०७.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सल्लागारांचे मासिक दर (कराशिवाय) | | | | दि.२०.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सल्लागारांचे मासिक दर (करांशिवाय) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पद | संख्या | दर (लाखात) | मासिक खर्च | पद | संख्या | दर (लाखात) | मासिक खर्च |
| प्रधान सल्लागार | ०१ | २.७५ | २.७५ | प्रधान सल्लागार | ०१ | ३.२४ | ३.२४ |
| वरिष्ठ | ०२ | २.२० | ४.४० | वरिष्ठ सल्लागार | ०२ | २.५२ | ५.०४ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सल्लागार | | | | | | | |
| सल्लागार | ०३ | १.६० | ४.८० | सल्लागार | ०० | २.२५ | ०० |
| सहाय्यक सल्लागार | ०० | -- | -- | सहाय्यक सल्लागार | ०३ | १.८० | ५.४० |
| एकूण | | | ११.९५ | एकूण | | | १३.६८ |

उक्त शासन निर्णयानुसार मे. केपीएमजी यांना देय सुधारित दर मंडळाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात येत आहे.

यावर मा. मालक प्रतिनिधी श्रीमती वेदा आगटे व मालक प्रतिनिधी श्री. कुटासकर यांनी सदर सल्लागारांची मंडळाला आवश्यकता आहे का, अशी विचारणा केली. तसेच e-Gov च्या सल्लागारांचे वेतन हे फार जास्त प्रमाणात आहे, असे मत व्यक्त केले.

याबाबत मंडळ सचिवांनी स्पष्ट केले की, मंडळाने वेळोवेळी पारित केलेल्या ठरावानुसार सुरक्षा संच वाटप, अत्यावश्यक संच वाटप, एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली (IWBMS), कामगार जिल्हा सुविधा केंद्र (WFC) व मध्यान्ह भोजन वाटप (०३ निविदा) अशा ०७ निविदाबाबतची कार्यवाही पूर्ण झाली अथवा प्रगतीपथावर आहे. याशिवाय नोंदीत बांधकाम कामगारांकरीता सायकल वाटप, बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी, बांधकाम कामगारांकरीता मोबाईल टॉयलेट, बांधकाम कामगारांकरीता नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणे, बांधकाम कामगारांकरीता मोबाईल डे-केअर युनिटची सुविधा पुरविणे, मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकर रक्कमेच्या व्यवस्थानापनाकरीता सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या मदतीने संगणकीय प्रणाली विकसित करणे या संबंधी ई-निविदा मागविण्यासाठी RFP चे प्रारूप तयार करणे, मंडळ बैठकीत सादरीकरण करणे, शासनस्तरावर सादरीकरण करणे, HPC कडे सादरीकरण करणे, सुचविण्यात आलेले बदल समाविष्ट करून सुधारित RFP तयार करणे, शासनमान्यतेअंती ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास मदत करणे, निविदा पूर्व बैठक, प्राप्त निविदांची तांत्रिक छाननी करणे, पात्र निविदाकारांच्या दरपत्रकांची छाननी करण्याकरीता मंडळास मदत करणे या व अनुषंगिक बाबींवर कार्यवाही करण्याकरीता सल्लागारांची मदत घेण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०१.०७.२०१४ रोजीच्या आदेशान्वये नियुक्त ०५ संस्थांपैकी मे. केपीएमजी या संस्थेची नेमणूक मंडळाच्या

दि.२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत मंजूर ठरावानुसार करण्यात आली होती तसेच, तदनंतर वेळोवेळी मंडळाने पारित केलेल्या ठरावानुसार माहे मार्च २०१९ पर्यंत त्यांच्या नेमणुकीस मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयातील मंजूर दराने मासिक मोबदला अदा करण्यात येत आहे. तथापि, माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.२०.०३.२०१८ रोजीच्या शासन आदेशान्वये सल्लागारांच्या मासिक मोबदल्याचे दर सुधारित करण्यात आलेले आहे. त्यानुसार मासिक मोबदला अदा करण्यासाठी मंडळाच्या मान्यतेस प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. यावर मा. अध्यक्षांनी सुचित केले की, याबाबत मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्याशी चर्चा करून मंडळाच्या आगामी बैठकीत निर्णय घेणे योग्य राहील. यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव क्र.४७(११)/२०१८: शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या पॅनेलवर नियुक्त संस्थेपैकी मे. केपीएमजी यांची मंडळाचे e-Gov सल्लागार म्हणून मंडळाच्या मान्येतने नियुक्ती करण्यात आलेली आहे. माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णय दि.२०.०३.२०१८ रोजीच्या आदेशान्वये शासनाच्या पॅनेलवरील सल्लागारांचे मासिक मोबदल्याचे दर सुधारित करण्यात आलेले आहेत. मंडळाकडील मे. केपीएमजी यांना शासन आदेशाच्या दिनांकापासून सदर सुधारित दर लागू करण्यासाठीचा प्रस्ताव मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

तथापि, मंडळाचे मा. अध्यक्ष यांच्या दि.०६.०९.२०१८ रोजीच्या पत्रात मे. केपीएमजी बाबत खालीलप्रमाणे मत व्यक्त केलेले आहे.

मे. केपीएमजी कडे मंडळाचे पुढील काही कालावधीत काम नसल्याने मे. केपीएमजी यांचे ०४ कर्मचारी ०१ नोंव्हेंबर २०१८ पासून कमी करण्यात यावे, जेणेकरून मंडळाच्या पैशाचा अपव्याप टळेल. भविष्यात जेव्हा केव्हा नवीन निविदा प्रक्रिया सुरू झाल्यास मे. केपीएमजी यांच्या वाढीव कर्मचारी संबंधी विचार करण्यात येईल.

मा. अध्यक्ष यांच्या पत्रास अनुसरून मंडळस्तरावरून मे. केपीएमजीबाबत खालीलप्रमाणे कळविण्यात आलेले आहे.

मंडळावर नियुक्त ई-सल्लागार कंपनी मे. केपीएमजी यांना माहे जून २०१८ पर्यंतची देयक दि. ०१.०७.२०१४ माहिती व तंत्रज्ञान(सा.प्र.वि) विभागाच्या शासन निर्णयानुसार अदा करण्यात आलेली आहे. परंतू, माहे जूलै २०१८ व ऑगस्ट २०१८ या दोन महिन्याचे वेतन त्यांनी शासन माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग दि. १९.०७.२०१७ च्या शासन निर्णयानुसार वाढीव दराने मागणी केलेली होती. परंतू, मंडळाच्या दि. १८.०७.२०१८ रोजी नागपूर येथे झालेल्या मंडळ बैठकीमध्ये मंडळाकडील मे. केपीएमजी या ई-सल्लागार कंपनीस उपरोक्त शासन आदेशाच्या दिनांकापासून सदर सुधारित दर लागू करण्यासाठीचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. परंतू, सदर सुधारित वेतन वाढीचा प्रस्ताव मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्याबाबत सर्वानूमते ठराव घेण्यात आला. त्यानुसार, मे. केपीएमजी या कंपनीचे सल्लागार यांच्या माहे जूलै २०१८ व ऑगस्ट २०१८ या दोन महिन्याचे वेतन पूर्वीप्रमाणे शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाच्या दि. ०१.०७.२०१४ च्या शासन निर्णयानुसार माहे जूलै २०१८ चे वेतन रक्कम रु. १३,८६,२००/- व माहे ऑगस्ट २०१८ चे वेतन रक्कम रु. १३,८६,२००/- ची देयके मंजूर करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच, मे. केपीएमजी यांचेकडील माहे नोव्हेंबर २०१८ पासून ४ कर्मचारी कमी करण्याबाबत त्यांना पत्राद्वारे कळविण्याबाबत आपण निर्देश दिलेले आहेत. परंतू, मे. केपीएमजी या ई-सल्लागार कंपनीकडून मंडळाकडील खालीलप्रकारची कामे करण्यात येत आहेत.

१. मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांना सुरक्षा संच वाटप करण्याबाबतची संपूर्ण ई-निविदा प्रक्रिया पुर्ण करुन वाटपाबाबतच्या कार्यवाहीबाबतची कार्यप्रणाली तयार करण्यात येत आहे.
२. मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच वाटप करण्याबाबतची संपूर्ण ई-निविदा प्रक्रिया पुर्ण करुन वाटपाबाबतच्या कार्यवाहीबाबतची कार्यप्रणाली तयार करण्यात येत आहे.
३. एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली (IWBMS) (RFP) तयार करणे व ई निविदा प्रक्रीयेने प्राप्त निविदा छाननी व व्यावसायिक विकास(commercial evalution) अहवाल तयार करणे.

४. जिल्हा कार्यालयात कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेबाबत व ई निविदा प्रक्रीयेने प्राप्त निविदा छाननी व व्यावसायिक विकास (commercial evalution) अहवाल तयार करणे.
५. मध्यान्ह भोजन व्यवस्था व ई निविदा प्रक्रीयेने प्राप्त निविदा छाननी व व्यावसायिक विकास(commercial evalution) अहवाल तयार करणे.
६. मंडळाची शासन ई-मार्केट जेम व संगणक इतर खरेदीचे प्रस्ताव तयार करणे.
७. मंडळ बैठक, शासनाकडील आढावा बैठका, केंद्र शासनाकडील मॉनिटरिंग बैठका यांचे प्रेझेंनटेशन बनविणे.
८. मंडळाकडे राबविण्यात आलेल्या अटल विश्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत विशेष नोंदणी अभियान टप्पा १ व २ बाबत संगणकीय अहवाल तयार करणे.
९. बांधकाम कामगारांना नाक्यावर शेड उभारण्याबाबत RFP तयार करणे.
१०. मंडळास सर्व संगणकीय कामकाजाबाबत सेवा व अहवाल तयार करणे.

तरी, मंडळाकडील कमी कर्मचारी वर्ग व कामाचा वाढता व्याप पाहता मे. केपीएमजी यांचेकडील कर्मचारी कमी केल्यास त्याचा परिणाम मंडळाच्या कामावर होऊ शकतो. तरी, मे. केपीएमजी यांचेकडील कर्मचारी कमी करण्याबाबतचा उचित निर्णय मंडळाच्या बैठकीत व्हावा व माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.२०.०३.२०१८ रोजी शासन निर्णयानुसार मासिक मोबदला सुधारित दराने मंजूरीचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर.

सदर विषयावर मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी असे नमुद केले की, शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या पॅनेलवर नियुक्त संस्थेपैकी मे. केपीएमजी यांची मंडळाचे e-Gov सल्लागार म्हणून मंडळाच्या मान्येतने नियुक्ती करण्यात आलेली आहे. माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णय दि.२०.०३.२०१८ रोजीच्या आदेशान्वये शासनाच्या पॅनेलवरील सल्लागारांचे मासिक मोबदल्याचे दर सुधारित करण्यात आलेले आहेत त्या दराने सल्लागारांना मासिक मोबदला देण्यास हरकत नाही. याबाबत मंडळाचे अध्यक्षांनी सूचित केले की, मंडळाकडे नेमलेल्या सल्लागारांपैकी काही सल्लागारांची सेवा कमी करता येते का याबाबत विचार व्हावा. या संदर्भात मा. प्रधान सचिवांनी मंडळाच्या सचिवांना विचारणा केली. यावर मंडळ सचिवांनी स्पष्ट केले की सद्यस्थितीत मंडळाने पारीत केलेल्या

ठराव व शासन मान्यतेनुसार प्रस्तावित योजनांची RFP तयार करणे, खरेदी समितीस सादर करणे, शासन मान्यतेअंती निविदा प्रक्रीया राबविणे, निविदा स्विकृतीअंती नियुक्त संस्थेबाबत करारनामा करणे या कामकाजाशी संबंधीत तांत्रीक कामकाजाकरीता नियुक्त सल्लागारांच्या सेवा आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र.४७(११)/२०१८: मंडळाने यापुर्वीच नियुक्त केलेल्या मे. केपीएमजी, e- Gov चे सल्लागार यांना माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णय दि.२०.०३.२०१८ रोजीच्या आदेशान्वये मंजूर सुधारीत दराने व वेळोवेळीच्या शासन आदेशाच्या दिनांकापासून सुधारित दराने मासिक मोबदला अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. ११ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या जमा निधीच्या गुंतवणुकीचा त्रैमासिक गोषवारा मंडळाच्या माहितीकरीता सादर.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर कल्याणकारी मंडळाच्या दि. २१.०३.२०१८ रोजीच्या संपन्न झालेल्या बैठकीमध्ये माहे जानेवारी, २०१८ पर्यंतची मंडळाने केलेल्या रक्कम रु. ६५८४.६५ कोटी मुदत ठेव गुंतवणूकीचा गोषवारा सादर करण्यात आला होता व सदर गोषवाऱ्यातील गुंतवणूकीस व गुंतवणूकीच्या व्याजदरास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

शासन वित्त विभागाच्या दि. २७.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार गुंतवणूकीचा माहे एप्रिल २०१८ ते जुन २०१८ या कालावधीचा त्रैमासिक अहवाल दि. ०१.०८.२०१८ रोजी प्रशासकीय विभागास सादर करण्यात आलेला आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ. क्र. | बँकेचे नाव | FDR No. | गुंतवणूक दिनांक | परिपक्व दिनांक | गुंतवलेली रक्कम (रू.कोटीत) | व्याजदर द.सा.द. शे. | गुंतवणूकीच्यापरिपक्वते नंतर मिळणारी रक्कम (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कॅनरा बँक | १५८९४४१० ०००२४/१ KB९९३८७३ | २४.०८.२०१७ | २४.०८.२०१८ | ५०० | ५.९० | ५३०.१५ |
| २. | कॅनरा बँक | १५८९४४१० ०००२४/२ KB९९३८९५ | ०४.१०.२०१७ | ०४.१०.२०१८ | ११०० | ६.०० | ११६७.४९ |
| ३. | बँक ऑफ इंडिया, एम.सी. बी., पुणे | ०५२१४५११ ०००१४६७ | १६.०८.२०१७ | १६.०८.२०१८ | ३४.६५ | ५.१० | ३६.४५ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | इंडियन ओव्हर सीस बँक | ०१२८०४०० ०००६०९९ Recipt No. NDRR०८७ ८४११ | ०६.०१.२०१८ | ०६.०१.२०१९ | ६०० | ६.४६ | ६३९.७० |
| ५. | सिंडीकेट बँक, मरोल ब्रॅन्च | ५०३२६११०० ०००२०/१ Recipt No. SBN ९६२८८५ | ०९.०१.२०१८ | ०९.०१.२०१९ | ६०० | ६.३५ | ६३९.०१ |
| ६. | पजांब नॅशनल बँक माहिम, मुंबई | ०५५४००C R००००००१ ४ | ०९.०१.२०१८ | ०९.०१.२०१९ | ६०० | ६.३५ | ६३९.०१ |
| ७. | बँक ऑफ बडोदा, बांद्रा (पुर्व), मुंबई | २९०४०३०० ०३१३१९ | १६.०४.२०१८ | १६.०४.२०१९ | ५०० | ६.८५ | ५३५.१३ |
| ८. | इंडियन बँक, जुहू विलेपार्ले , मुंबई | ६६३०६८४३ ६५ TDR NO. ०५२६५५३ | ०८.०५.२०१८ | ०८.०५.२०१९ | १००० | ७.०१ | १०७१.९६ |
| ९. | विजया बँक, बांद्रा (पुर्व), मुंबई | ५००२०३५० १०००११५ Recipt No. ५०४६८ | १५.०५.२०१८ | १५.०५.२०१९ | १००० | ७.०६ | १०७२.४९ |
| १०. | सिंडीकेट बँक, | ५०३२५११०० ०००५/१ | २२.०५.२०१८ | २२.०५.२०१९ | ४०० | ७.११ | ४२९.२० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मरोल ब्रॅन्च, मुंबई | Recipt No. SBN ९६२०९० | | | | | |
| ११. | पंजाब ॲन्ड सिंध बँक, मलबार हिल, मुंबई | ०४२८१४०० ०५११५७ Recipt No. ३९३४६३ | २२.०५.२०१८ | २२.०५.२०१९ | ४०० | ७.११ | ४२९.२० |
| १२. | पंजाब ॲन्ड सिंध बँक, मलबार हिल, मुंबई | ०४२८१४०० ०५११५७ | ३०.०६.२०१८ | ३०.०६.२०१९ | ६०० | ७.२३ | ६४४.५७ |
| | | | **एकुण** | | **७३३४.६५** | | **७८३४.३६** |

उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार प्रत्येक महिन्याला मुदत ठेवीच्या रकमा सुरक्षित असून त्यावर कोणत्याहीं प्रकारचे कर्ज/तारण/ओवर ड्राफट नसल्याचे प्रमाणपत्र संबंधित ठेवीदार बँकांकडून घेणे अनिवार्य आहे. त्यानुसार मंडळाच्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक ज्या बँकांत करण्यात आलेली आहे त्या बँकाकडुन प्रत्येक महिन्याला मंडळाची गुंतवणूक सुरक्षित असून त्यावर कर्ज/तारण/ओवर ड्राफट नसल्याचे प्रमाणपत्र नियमित प्राप्त करून घेण्यात येतात त्यानुसार माहे संप्टेबर, २०१८ पर्यतच्या कालावधीत मंडळाच्या पंजाब नॅशनल बँक, पंजाब ॲन्ड सिंध बँक, इंडियन बँकांची मुदत ठेव गुंतवणुक सुरक्षित असल्याची प्रमाणपत्रे प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि. २१.०८.२०१८ रोजीच्या मंजुर टिप्पणीच्या अनुषंगाने मंडळाने गुंतवणुक केलेल्या एकुण ११

बँकेतील ७३०० कोटी निधीची प्रत्यक्ष बँकेत जावून पडताळणी करण्याबाबत मंडळाकडील सेवानिवृत्त अधिकारी यांना आदेशित करण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी मंडळाचे ११ मुदत ठेवी खातेदार असलेल्या बँकांचे दि. २४.०८.२०१८, २७.०८.२०१८, १२.०९.२०१८ व २९.०९.२०१८ रोजी प्रत्यक्ष संबंधित बँकांना भेटी देऊन मुदत ठेवीचा खाते क्र. मुदत ठेव गुंतवणुक केल्याची तारीख, परिपक्वतेची दिनांक, गुंतविलेली रक्कम, व्याजदर, परिपक्वतेनंतर मिळणारी रक्कम व सदर मुदत ठेवीच्या रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे कर्ज/Over Draft नसल्याबाबत बँकेच्या संगणक प्रणालीमध्ये प्रत्यक्ष पडताळणी केली आहे व त्याची नोंद नोंदवहीत घेऊन मुदत ठेव गुंतवणुकीची माहिती संगणकावर उपलब्ध करून देणाऱ्या बँक अधिकाऱ्याची सही व शिक्का नोंदवहीत नमूद करण्यात आलेला आहे. सदर नोंदवही मंडळाचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करण्यात आलेली आहे.

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने माहे ०६ ऑक्टोंबर, २०१८ अखेर केलेल्या जमा उपरकर रक्कमेच्या गुंतवणूकीचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.**

| अ. क्र. | बँकेचे नाव | FDR No. | गुंतवणूक दिनांक | परिपक्व दिनांक | गुंतवलेली रक्कम (रू.कोटीत) | व्याजदर द.सा.द.शे. | गुंतवणूकीच्या परिपक्वते नंतर मिळणारी रक्कम (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इंडियन ओव्हरसीस बँक,बांद्रा पश्चिम, मुंबई | ०१२८०४०००००६०९९ Recipt No. NDRR०८७८४११ | ०६.०१.२०१८ | ०६.०१.२०१९ | ६०० | ६.४६ | ६३९.७० |
| २ | सिंडीकेट बँक, मरोल ब्रन्च, मुंबई | ५०३२६११०००००२०/१ Recipt No. SBN ९६२८८५ | ०९.०१.२०१८ | ०९.०१.२०१९ | ६०० | ६.३५ | ६३९.०१ |
| ३ | पजांब नॅशनल बँक माहिम, मुंबई | ०५५४००CR००००००१४ | ०९.०१.२०१८ | ०९.०१.२०१९ | ६०० | ६.३५ | ६३९.०१ |
| ४ | बँक ऑफ बडोदा, बांद्रा (पुर्व), मुंबई | २९०४०३०००३१३१९ | १६.०४.२०१८ | १६.०४.२०१९ | ५०० | ६.८५ | ५३५.१३ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | इंडियन बँक, जुहू विलेपार्ले, मुंबई | ६६३०६८४३६५ TDR NO. ०५२६५५३ | ०८.०५.२०१८ | ०८.०५.२०१९ | १००० | ७.०१ | १०७१.९६ |
| ६ | विजया बँक, बांद्रा (पुर्व), मुंबई | ५००२०३५०१०००११५ Recipt No. ५०४६८ | १५.०५.२०१८ | १५.०५.२०१९ | १००० | ७.०६ | १०७२.४९ |
| ७ | सिंडीकेट बँक, मरोल ब्रॅन्च, मुंबई | ५०३२५११००००००५/१ Recipt No. SBN ९६२०९० | २२.०५.२०१८ | २२.०५.२०१९ | ४०० | ७.११ | ४२९.२० |
| ८ | पंजाब ॲन्ड सिंध बँक, मलबार हिल, मुंबई | ०४२८१४०००५११५७ Recipt No. ३९३४६३ | २२.०५.२०१८ | २२.०५.२०१९ | ४०० | ७.११ | ४२९.२० |
| ९ | पंजाब ॲन्ड सिंध बँक, मलबार हिल, मुंबई | ०४२८१४०००५११५७ | ३०.०६.२०१८ | ३०.०६.२०१९ | ६०० | ७.२३ | ६४४.५७ |
| १० | युनियन बँक ऑफ इंडिया, विलेपार्ले पश्चिम,मुंबई | ४०८१०३०३०५७९१३२ Recipt No. ८४३६३२ | २८.०८.२०१८ | २८.०८.२०१९ | ८५० | ७.११ | ९११.०६ |
| ११ | आंध्रा बँक, खार पश्चिम, मुंबई | ११३९२०१०००८४७६२ Recipt No. १५६२२४ | ०६.१०.२०१८ | ०६.१०.२०१९ | १००० | ७.४० | १०७६.०७ |
| १२ | पंजाब नॅशनल बँक,वरळी नाका, मुंबई | ०५६४००UR००००० ०९१८ Recipt No. ०५६४०० | ०६.१०.२०१८ | ०६.१०.२०१९ | ३९० | ७.४० | ४१९.६७ |
| | | एकुण | | | ७९४०.० | | ८५०८.०७ |

मंडळाने माहे ०६ ऑक्टोंबर, २०१८ पर्यंत एकुण रक्कम रू. ७९४० कोटी एवढया जमा निधीची विविध बँकेंत केलेल्या गुंतवणुकीचा उपरोक्त गोषवारा मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त विषयाची सर्व मंडळ सदस्यांनी नोंद घेतली. त्याबाबतचा ठराव खालीलप्रमाणे

**ठराव क्र.४८(११)/२०१८: महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या उपसमितीने दिनांक ०६ ऑक्टोंबर, २०१८ पर्यंत जमा उपकर रक्कम रू. ७९४० कोटी एवढया निधीचा विविध बँकेंत केलेल्या गुंतवणुकीचा त्रैमासिक गोषवारा व गुंतवणुकीच्या सुरक्षेसंदर्भात करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांची माहिती मंडळाच्या माहितीकरीता सादर करण्यात आला त्याची सर्व मंडळ सदस्यांनी नोंद घेतली. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र. १२ : सन २०१४- १५ व सन २०१५-१६ चे सुधारित लेखे मंडळाच्या मान्यतेस सादर.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील नियम २७ अन्वये मंडळाच्या आर्थिक वर्षातील कामकाजाचे लेखा व लेखापरीक्षण अहवाल प्रत्येक वर्षी विधीमंडळात ठेवण्यासाठी शासनास सादर करणे आवश्यक आहे.

त्यानूसार मंडळाच्या दि. ०५.१२.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र. १ अन्वये सन २००७-०८ ते २०११-१२ या आर्थिक वर्षाच्या व मंडळाच्या दि.०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीतील मुद्या क्र.१४ अन्वये सन २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षाच्या लेखा/लेखापरीक्षण अहवाल व वार्षिक अहवालास मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यानुसार सदर वर्षांचे संव्यवहार लेखापरीक्षण (Transaction Audit) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांजकडून पुर्ण करण्यात आलेले आहे.

मंडळाचे सन २०१४-१५ या वर्षाचे सनदी लेखापालांनी केलेल्या लेखा व लेखापरीक्षण अहवालावरून सदर वर्षाचे वार्षिक अहवाल तयार करण्यात आलेले होते व सदर अहवालास मंडळाच्या दि.०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीतील मुद्या क्र.१५ नुसार मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक कार्यालयाच्या मंडळाचे सन २०१२-१३ व २०१३-१४ चे लेखापरीक्षण अहवालात सुचविलेल्या दुरुस्त्या सन २०१४-१५ मध्ये करण्यात आलेल्या असल्याने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे सुधारीत लेख्यांस व सन २०१५-१६ च्या लेख्यांस मंडळाच्या दि.२२.०५.२०१८ रोजीच्या बैठकीतील मुद्या क्र. ०८ नुसार मान्यता प्रदान करण्यात आलेली होती.

सदर वर्षाचे संव्यवहार लेखापरीक्षण (Transaction Audit) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांजकडून पुर्ण करण्यासाठी त्यांना सादर केले असता त्यांचेकडून सुचविल्यानुसार यापूर्वीच्या नमुन्यात लेख्यांची मांडणीत सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे तयार करण्यात आले असून त्यांचे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांजकडून संव्यवहार लेखापरीक्षण करून ते विधीमंडळात सादर

करण्यापूर्वी  त्यास मंडळाची मान्यता प्रदान होणे आवश्यक आहे. तरी, सन सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे सुधारित वार्षिक लेखे मंडळाच्या मान्यतेस्तव सादर.

मंडळाच्या मान्यतेनंतर सन २०१४-१५ व २०१५-१६ च्या लेख्यांचे लेखापरिक्षण महालेखापाल कार्यालयाकडून करून घेण्यात येईल.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**४८(१२)/२०१८ ठराव: सन २०१४-१५ व २०१५-१६ चे सुधारित वार्षिक लेख्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. १३ :- उपकर परतावा बाबतचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम १९९६ मधील कलम ३(१) व भारत सरकार यांचे दि. २३.०९.१९९६ चे परिपत्रक तसेच महाराष्ट्र शासनाच्या दि. २१.०४.२००८ च्या परिपत्रकानूसार बांधकामावरील खर्चाच्या १ टक्केपेक्षा कमी नाही एवढा (जमीनीची किंमत वगळून) उपकर मंडळाकडे जमा करण्याची तरतूद आहे. त्यानुसार, विविध प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून मंडळाकडे उपकर भरणा केला जातो.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर नियम १९९८ मधील कलम ८ अन्वये उपकराची परिगणना चूकीची झाल्यास अथवा चुकीच्या पध्दतीने उपकराचा भरणा मंडळाकडे झाल्यास तो परतावा करण्याबाबत तरतूद आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या बँक खात्यात अनावधानाने/नजरचुकीने उपकराची जास्तीची रक्कम भरणा केलेल्या एकूण १८ प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून उपकराच्या रकमेच्या परताव्याची मागणी करण्यात आलेली होती. सदर उपकर परताव्याची प्रकरणे मंडळाच्या दि. १६.०६.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यतेस्तव सादर करण्यात आली होती. मंडळाच्या बैठकीत चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला होता.

**ठराव: उपकराच्या परताव्यांचे प्रत्येक प्रकरण हे मंजूरीसाठी मंडळासमोर ठेवून, ज्यांच्याकडून चुकीने पैसे प्राप्त झाले आहेत त्याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर ते तपासून त्यांना परत करण्यात यावेत.**

मंडळाच्या उपरोक्त ठरावानूसार विविध कार्यालय/संस्थांकडून/व्यक्तीकडून प्राप्त उपकर परताव्याचे प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत वेळोवेळी सादर करण्यात आलेले आहे. मंडळाच्या पारीत ठरावानूसार क्षेत्रिय कार्यालयाकडून अहवाल प्राप्त करून शासन मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहे.

मंडळाकडे सद्यस्थितीत खालील उपकर परताव्याचे प्रकरण प्राप्त झालेले असून, सदर व्यक्तिंकडून नजरचुकीने बांधकाम कामगाराच्या उपकरापोटी भरणा करण्यात आलेल्या जास्तीच्या उपकराची मागणी केलेली आहे. तपशील पुढीलप्रमाणे:-

| अनु. क्र. | व्यक्तिचे नाव | उपकर परताव्याचे कारण | उपकर परताव्याच्या मागणीची रक्कम (रुपयात) |
|---|---|---|---|
| १. | श्री. श्याम रामकृष्ण खंडेश्वर, नागूपर. | महानगर पालिका, नागपूर यांनी बांधकाम परवानगीसाठी उपकराची व नगर पालिका बांधकाम शुल्काची रक्कम चुकीने मंडळाच्या बँक खात्यात जमा करण्यास कळविल्यानूसार चुकीने भरणा करण्यात आलेली नगर पालिका शुल्काच्या परताव्याची मागणी. | २१,४८,७१७/- |
| | **एकूण** | | **२१,४८,७१७/-** |

प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून मंडळाकडे अनावधानाने/नजरचुकीने भरणा केलेल्या रक्कम रु. **२१,४८,७१७/-** एवढया उपकराच्या परताव्याचे प्रकरणे मंडळ मान्यतेसाठी सादर.

मंडळ मान्यतेनंतर सदर परताव्याचे प्रकरण संबंधित क्षेत्रिय कार्यालयांकडे पडताळणीसाठी पाठविण्यात येतील. पडताळणीचा अहवाल व शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या परताव्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

उपरोकत् विषयावर खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र.४८(१३)/२०१८: नागपूर महानगरपालीका, नागपूर यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार श्री. श्याम रामकृष्ण खंडेश्वर, नागूपर यांनी नजर चुकीने मंडळाच्या खात्यात जमा केलेली उपकरा शिवाय बांधकाम परवानगीच्या अन्य बाबींची रक्कम रु. २१,४८,७१७/- परत करण्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर उपकर परताव्याबाबत शासन मान्यता प्राप्त करुन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.१४: मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार अप्पर कामगार आयुक्त, नागपूर यांच्या कार्यालयाकरीता GeM पोर्टल ऐवजी स्थानिक पातळीवर दरपत्रके मागवून ३ संगणक व २ प्रिंटर खरेदी करण्यात आली. मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेस सादर.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाचे मुख्यालय, विभागीय तसेच प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी बाहय यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना बांधकाम कामगारांची नोंदणी करणे, मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना राबविणे व त्यांना लाभ देणे व इतर अनुषंगिक कार्यालयीन कामकाजासाठी संगणक व प्रिंटर्स उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने, प्रत्येक जिल्हा कार्यालयास २ संगणक व १ मोठे प्रिंटर्स (स्कॅनर, झेरॉक्स, प्रिंटर) तसेच प्रत्येक विभागीय कार्यालयास २ संगणक व १ मोठे प्रिंटर्स (स्कॅनर, झेरॉक्स, प्रिंटर) व मुंबई येथील मुख्यालयासाठी ५ संगणक व २ मोठे प्रिंटर्स (स्कॅनर, झेरॉक्स, प्रिंटर) आणि ३ छोटे (स्कॅनर, झेरॉक्स, प्रिंटर) अशा एकुण ९९ संगणक व ५२ प्रिंटर्स खरेदीस शासनाच्या दि. ३०.०६.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

परंतू, शासन, सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभागाच्या शासन निर्णय दि. ०९.०८.२०१६ नुसार माहिती व तंत्रज्ञान मंडळाची निर्मिती केलेली असून शासनाच्या अधिपत्याखालील सर्व महामंडळानी संगणक प्रिंटर्स व त्यासंबंधीत इतर साधनसामुग्री महामंडळामार्फतच खरेदी करणे अनिवार्य आहे. त्यानुसार, मंडळाच्या मुख्यालय, विभागीय व जिल्हा कार्यालयांकरीता आवश्यक असलेले ९९ संगणक व ५२ प्रिंटर्स खरेदी करुन मंडळास पुरवठा करुन देण्याबाबत मंडळाच्या दि. ०८.११.२०१६ रोजीच्या पत्रान्वये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान यांना कळविण्यात आले होते. तसेच, दि. १०.०२.२०१७ व दि. २७.०४.२०१७ रोजीच्या स्मरणपत्रान्वये कळवून सुध्दा बराच कालावधी उलटून गेल्यानंतरही त्यांच्याकडून मंडळास आवश्यक असलेले संगणक व प्रिंटर्स पुरविण्यात आलेले नाहीत.

मंडळाकडे उपलब्ध असलेल्या कर्मचारी व अपूरी संगणकाची संख्या तसेच, जुन्या संगणकाच्या दुरुस्तीवर होणारा ज्यादा खर्च तसेच मंडळाचे विभागीय, जिल्हा कार्यालयांकडील अपूऱ्या संगणक व प्रिंटर्सच्या अभावी मंडळाच्या बांधकाम कामगारांच्या

नोंदणीवर व दैनंदिन कामकाजावर होणारा परिणाम पाहता विभागीय व जिल्हा कार्यालयांना Govrnment e-Market (GEM) पोर्टलवरून अथवा स्थानिक पातळीवर दरपत्रके मागवून कमी दर असलेल्या पुरवठादारांकडून संगणक, प्रिंटर व स्कॅनर खरेदीबाबत दि. ०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

त्यामुळे दिवसेंदिवस मंडळाच्या कामाचा वाढता व्याप पाहता अपूऱ्या संगणक व प्रिंटर्सच्या संख्येमुळे मंडळाच्या बांधकाम कामगारांच्या नोंदणी प्रक्रिया व दैनंदिन कामकाजावर त्याचा परिणाम होत असल्याने जिल्हा कार्यालयांकडून संगणक व प्रिंटर्स उपलब्ध करुन देण्याबाबत व खरेदी करण्यास मान्यता मिळण्याबाबतचे प्रस्ताव मंडळाकडे प्राप्त झालेले आहेत.

मंडळाचे विभागीय व जिल्हा कार्यालयांकडील अपूऱ्या संगणक व प्रिंटर्सच्या अभावी मंडळाच्या बांधकाम कामगारांच्या नोंदणीवर व दैनंदिने कामकाजावर होणारा परिणाम पाहता विभागीय व जिल्हा कार्यालयांना Government e-Market (GeM) पोर्टलवरुन अथवा स्थानिक पातळीवर दरपत्रके मागवून कमी दर असलेल्या पुरवठादाराकडून संगणक, प्रिंटर व स्कॅनर खरेदी व सदर खरेदीवरील खर्चास मंडळाच्या दि. ०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आलेला आहे.

**ठराव: मंडळाच्या कार्यालयीन कामकाजाकरीता ५ विभागीय कार्यालयांना व ४२ जिल्हा कार्यालयांना प्रत्येकी २ संगणक, १ प्रिंटर (स्कॅनर सुविधेसह) मशिन तसेच मुख्यालयाकरीता आवश्यक १५ संगणक, ३ प्रिंटर (स्कॅनर सुविधेसह), बैठकींना सादरीकरण करण्याकरीता ०१ प्रोजेक्टर, वरिष्ठ अधिकाऱ्यांकरीता ३ आयपॅड खरेदीस व त्यासाठी अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदर खरेदी Government e-Market (GeM) पोर्टलद्वारे करुन मुख्यालय, सर्व विभागीय व जिल्हा कार्यालयांना पुरवठा करण्यात यावा**, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

तसेच मंडळाकडून सदर संगणक व प्रिंटर्स Government e-Market (GeM) पोर्टलवरून खरेदी करण्याची कार्यवाही सुरु आहे. परंतू, सदर खरेदी प्रक्रीयेमध्ये उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे सदर खरेदीस विलंब होत आहे व त्यामुळे मंडळाची विभागीय व जिल्हा कार्यालयांत संगणक व प्रिंटर्स पुरवठा करण्यात आलेला नाही.

मंडळाचे मा. अध्यक्ष यांच्या दि. २७.०८.२०१८ रोजीच्या पत्रान्वये अप्पर कामगार आयुक्त नागपूर कार्यालयास ८ संगणक, ४ प्रिंटर तथा १ झेरॉक्स स्कॅनिंग मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत कळविलेले आहे. त्याप्रमाणे, मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार अप्पर कामगार आयुक्त, नागपूर यांच्या कार्यालयाकरीता GeM पोर्टल ऐवजी स्थानिक पातळीवर दरपत्रके मागवून ३ संगणक व २ प्रिंटर खरेदी करण्याकरीता मंडळाच्या दि. १०.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे तथापि सदर खरेदी करताना दरपत्रकाद्वारे प्राप्त होणारे दर GEM पोर्टलवरील दरापेक्षा जास्त असणार नाही यांची दक्षता घेणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहे. त्यानूसार GEM पोर्टल एवजी स्थानिक दरपत्रकाद्वारे खरेदीचा प्रस्ताव मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

सदर प्रस्तावाला खालील प्रमाणे मान्यता देण्यात आली.

**ठराव क्र.४८(१४)/२०१८: अप्पर कामगार आयुक्त, नागपूर यांच्या कार्यालयाकरीता मंडळाचे अध्यक्ष यांच्या सूचनेनुसार GeM पोर्टल ऐवजी स्थानिक पातळीवर दरपत्रके मागवून खरेदी करण्यात आलेले ३ संगणक व २ प्रिंटरच्या खरेदीस विशेष बाब म्हणून मंडळाची कार्योत्तर मान्यता प्रदान कण्यात येत आहे. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र. १५: सहाय्यक कामगार आयुक्त, इचलकरंजी कार्यालयाकरीता तात्पुरत्या स्वरुपात जागा भाडयाने घेण्यास मंजूरी मिळणेबाबत.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या इचलकरंजी कार्यालयाचे कामकाज सद्यस्थितीत सहाय्यक कामगार आयुक्त, इचलकरंजी यांच्या कार्यालयात चालू आहे. तसेच मंडळाच्या कामकाजाचा वाढता व्याप पाहता व मंडळाच्या कर्मचारी व अधिकारी यांना बसण्यासाठी व अभिलेख ठेवण्यासाठी जागा अपूरी होत असल्यामुळे सहाय्यक कामगार आयुक्त, इचलकरंजी यांनी मुख्याधिकारी इचलकरंजी नगरपालिका यांजकडे उपलब्ध जागा भाडे तत्वावर मिळण्याबाबत मागणी केलेली होती.

मुख्याधिकारी इचलकरंजी नगरपालिका यांच्या जा.क्र.इनप/मिळकत/भाडे/वशि१५७/२०१७ दि. २४.१०.२०१७ रोजीच्या पत्रान्वये नगरपरिषद जुनी नगरपालिका इमारती मधील दक्षिणेकडील करवसुली विभागाची खोली/हॉल १२० चौ. फुट मागणी केल्यानुसार मे. कौ. ठराव क्र. १७१ दि. १९.०९.२०१७ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ठरवून येईल त्या दराने अधिक घरफळा, शासकीय निमशासकिय कर भरणा करणेचे अधिन राहून इचलकरंजी नगरपालिका यांनी मान्यता दिल्याचे व सदर जागा मंडळास भाडे तत्वावर घेण्यास मंजूरी प्रदान करण्याबाबत सहाय्यक कामगार आयुक्त, इचलकरंजी यांनी विनंती केली आहे.

तसेच, इचलकरंजी कार्यालयाच्या दि. २६.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मंडळाचे स्वतंत्र कार्यालय होईपर्यंत जागा भाडयाने घेण्यात येईल असे कळविलेले आहे. तरी, मंडळाच्या इचलकरंजी येथील कार्यालयास सुविधा केंद्राची जागा उपलब्ध होईपर्यंत इचलकरंजी नगरपालिकेकडून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रमाणित दरानुसार उपलब्ध करुन देण्यात येणारी जागा भाडे तत्वावर घेण्यासाठी मंडळाच्या मान्यतेस्तव सादर.

सदर प्रस्तावावर खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

**ठराव क्र.४८(१४)/२०१८: सहाय्यक कामगार आयुक्त, इचलकरंजी कार्यालयाकरीता नगरपरिषद जुनी नगरपालिका इमारतीमधील दक्षिणेकडील कर वसुली विभागाची खोली/हॉल क्षेत्रफळ १२० चौ.फूट मंडळाचे जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापित**

होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रमाणपत्रानुसार भाडयाने घेण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र. १६:- विमान प्रवासाची देयके मंजूर करणेबाबत.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाच्या दि. ०५.१२.२०१६ रोजीच्या बैठकीतील विषय क्र. ४ अन्वये मंडळाचे मा. अध्यक्ष व मंडळाचे अधिकारी यांना मंडळाच्या तातडीच्या व महत्वाच्या कामानिमित्त कराव्या लागणाऱ्या विमान प्रवासास मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे दि. ०४.०७.२०१८ रोजी नागपूर येथे झालेल्या अटल विश्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत विशेष नोंदणी अभियान टप्पा- २ च्या ई- शुभारंभाच्या कार्यक्रमासाठी व मंडळाची दि. १८.०७.२०१८ रोजी नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या ४७ व्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी मा. अध्यक्ष यांचे निर्देशानूसार मंडळाचे सदस्य श्रीमती. वेदा आगटे यांनी पुणे-नागपूर-पुणे असा विमानाने प्रवास केलेला आहे. त्याचे प्रवास भाडे रु. ३०,१३१/- एवढे आहे.

तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे सुमोटो याचिका क्र. SMW (C) No.१/२०१५ च्या सुनावणीस तातडीने हजर राहण्यासाठी मंडळाचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसोबत मंडळाचे कर्मचारी, श्री. प्रवीण बनकर, लिपिक टंकलेखक, यांनी दि. ०९.१०.२०१८ ते १२.१०.२०१८ या कालावधीत मुंबई-दिल्ली-मुंबई असा विमानाने प्रवास केला आहे. त्याचे भाडे रु. १२,०९८/- आहे.

तरी, मंडळाच्या मा. सदस्य श्रीमती. वेदा आगटे व मंडळाचे कर्मचारी, श्री. प्रवीण बनकर, लिपिक टंकलेखक, यांनी केलेल्या उपरोक्त विमान प्रवासावरील खर्च रु.४२,२२९/- मंडळाच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्र.४८(१६)/२०१८: मंडळाचे मालक प्रतिनिधी श्रीम. वेदा आगटे, यांनी विशेष अभियानाच्या टप्पा-२ च्या शुभारंभाकरीता केलेल्या पुणे-नागपूर-पुणे विमान प्रवासावरील खर्च रु. ३०,१३१/- व मंडळातील कर्मचारी श्री. प्रविण बनकर, लिपिक टंकलेखक यांनी मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिकेच्या सुनावणी सबंधाने केलेल्या मुंबई-दिल्ली-मुंबई या विमान प्रवासावरील खर्च रु. १२,०९८/- अशा एकूण रक्कम**

रू. ४२,२२९/- एवढया खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

आयत्या वेळचा विषय

**विषय क्र.०१ :- बांधकाम कामगारांची नोंदणी व लाभ वाटपाच्या कामाकरीता क्षेत्रिय कार्यालयांना वाहन उपलब्ध करून देणेबाबत.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत राबविण्यात आलेल्या विशेष नोंदणी अभियानाच्या टप्पा ०१ व टप्पा ०२ मध्ये ज्या जिल्हयांचा समावेश होता त्या जिल्हयांकरीता अभियान कालावधीत नोंदणी केंद्राच्या प्रमाणात वाहन उपलब्ध करून देण्यात आले होते.

मा. मंत्री महोदय (कामगार विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली व मा. प्रधान सचिव (कामगार) यांच्या उपस्थितीत दि.२९.१०.२०१८ रोजी दुपारी ३.३० वा. संपन्न अप्पर कामगार आयुक्त/ कामगार उप आयुक्त/ सहाय्यक कामगार आयुक्त/ सरकारी कामगार अधिकारी यांची अत्यावश्यक संच/ सुरक्षा संच वाटप, लाभ वाटपाकरीता प्रलंबित प्रकरणांचा आढावा व अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत विशेष नोंदणी अभियानाचा टप्पा -०३ राबविणेबाबत संपन्न बैठकीत झालेल्या सविस्तर चर्चेअंती क्षेत्रिय कार्यालयांना प्रस्तावित संचाचे वाटप तसेच प्रलंबित लाभ वाटपाचे अर्ज निकाली काढण्यासाठी आवश्यक फिरतीकरीता वाहन उपलब्ध करून देणेबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी विनंती केलेली आहे.

दि.२९.१०.२०१८ रोजी संपन्न् बैठकीत घेण्यात आलेल्या आढाव्यामध्ये क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८ व २०१८-१९ या चालू वित्तीय वर्षातील मोठया प्रमाणात लाभाचे अर्ज प्रलंबित आहे. गतवर्षी मंजूर हत्यारे/ अवजारे खरेदीकरीता प्रति बांधकाम कामगार रू.५०००/- अर्थसहाय्य वाटपाकरीता राज्यात एकूण ३,४९,५७२ एवढे अर्ज प्राप्त झालेले असून त्यापैकी १,५४,८९५ एवढे अर्ज निकाली काढून रू.७७.४५ कोटी एवढया लाभाचे वाटप करण्यात आलेले आहे व अद्यापही १,९४,६७७ अर्ज प्रलंबित आहेत. याशिवाय चालू वित्तीय वर्षात नोंदीत जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाचा निर्णय मंडळ व शासन स्तरावरून घेण्यात आलेला आहे. सदर संच पुरवठा व वाटप करण्यासाठी पुरवठादार संस्था निश्चित करण्यात आलेली आहे. पुरवठादार संस्थेस दि.१४.०६.२०१८ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत. सदर संच वाटपाकरीता गती देण्यासाठी क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी,

नोंदणीकृत बांधकाम कामगार संघटना, स्वंयसेवी संस्था, अनुलोम संस्था यांच्या सोबत समन्वय साधून पुरवठादार संस्थेने कॅम्पचे आयोजन करून आगामी ०२ महिन्यात दोन्ही संच वाटपाची कार्यवाही करावी असा निर्णय उपरोक्त बैठकीत घेण्यात आला.

नोंदीत जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना लाभ वाटपाबाबत करावयाच्या कार्यवाहीकरीता मागणीप्रमाणे प्रत्येक विभागीय व जिल्हा कार्यालयास प्रत्येकी ०१ टाटा बुलेरो वाहन भाडेतत्वावर उपलब्ध करून देणे प्रस्तावित आहे. भाडेतत्वावर उपलब्ध करून द्यावयाच्या वाहनाचा कालावधी व त्यावरील खर्चास मंडळाच्या मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारीत झाला.

**ठराव क्र.४८(१६)/२०१८: बांधकाम कामगारांची नोंदणी व लाभ वाटपाच्या कामाकरीता क्षेत्रिय प्रत्येक कार्यालयाला एक या प्रमाणे टाटा बुलेरो हे वाहन आगामी दोन महिन्याकरीता उपलब्ध करून देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

सर्व विषयांवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर मंडळ सचिव यांनी मंडळाचे मा. मंत्री महोदय (कामगार), मा. अध्यक्ष, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहिर केले.

******************